१०२ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

• पुणे, गुरुवार २१ नोव्हेंबर, २०२४ • वर्ष-४, अंक-६५, पाने-८, किंमत : ₹ ६ NAVAKAL

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Issue - 65, Vol.- 4 Marathi - Daily - Pune, 21 November, 2024 Page- 8 Price- Rs. 6/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

# 'फुकट'ची खैरात की, किळसवाणे राजकारण जनतेने मतदान वाढवत कोणता निर्णय घेतला?

**अत्यंत गलिच्छ राजकारण, बेलगाम अर्वाच्च भाषणे, निर्लज्ज फोडाफोडी आणि उमेदवार पळवापळवी यामुळे महाराष्ट्रातील तमाम जनतेला नकोशी झालेली विधानसभा निवडणूक आता अंतिम टप्प्यात आली आहे. आज महाराष्ट्राच्या जनतेने उत्साहाने मतदान करून गेल्या वेळचा ६१.४४ टक्के मतदानाचा टप्पा पार केला. यामुळे उत्सुकता अधिकच वाढली आहे. हे अधिकचे मतदान कुणाच्या पारड्यात पडेल, महाराष्ट्रातून सौदेबाजीचे राजकारण तडीपार करण्याचा निर्णय मतदारांनी घेतला की, फुकट योजनांच्या खैरातीला मतदारांनी पसंती दिली, याचा निर्णय आज मतपेटीत बंद झाला आहे. आजच्या मतावर महाराष्ट्राचे राजकारण अवलंबून आहे.**


(छाया : दीपक साळवी)

■ मुंबई

**आज** सुमारे ६२ टक्के मतदान झाले. २०१९च्या निवडणुकीपेक्षा हे मतदान अधिक असल्याने मतदारांनी भरभरून महायुतीला मतदान केले की, मविआला सत्तेत आणण्यासाठी मतदान केले हे शनिवारी २३ नोव्हेंबरलाच कळेल.मतदानानंतर विविध वाहिन्यांवर दाखविलेल्या एक्झिट पोलमध्ये महायुतीचीच सरशी दाखविण्यात आली आहे. यामुळे महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस येतात का याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

आज मतदानाचा टक्का वाढला असला तरी महाराष्ट्राचा निवडणूक इतिहासात प्रथमच राज्यभर विविध मतदान केंद्रांवर हिंसक घटना घटल्या. भाजपा आणि शरद पवार गट, शिंदे गट आणि उबाठा अशा विविध गटांच्या कार्यकर्त्यांनी अनेक मतदान केंद्रांवर एकमेकांविरोधात तक्रारी केल्या. कार्यकर्त्यांची हाणामारी, ईव्हीएम मशीन फोडणे, कोणाला मतदान करायचे याची सूचना देणे, नेत्याची एकमेकांशी अर्वाच्च भाषेत शिवीगाळ, मतदारांना वाहनातून आणणे, मतदान केंद्रात वीज गायब होणे असे असंख्य प्रकार आज घडले. यापूर्वी इतक्या प्रमाणात कार्यकर्त्यांमध्ये तणाव कधीही दिसलेला नव्हता. पैसे वाटपाच्या घटनांवरून आजही मारहाण झाली. पोलिसांनी सर्वत्र सतर्क राहून आपली कामगिरी चोख बजावली. याबाबत काँग्रेसने आयोगाकडे

पान ७ वर

**राज्यातील जिल्हानिहाय मतदानाची टक्केवारी पुढीलप्रमाणे :**

| | |
|---|---|
| अहमदनगर - ६४.९५ टक्के | नागपूर - ५९.०६ टक्के |
| अकोला - ५९.१६ टक्के | नांदेड - ५८.८८ टक्के |
| अमरावती -६१.४८ टक्के | नंदुरबार- ६६.७२ टक्के |
| औरंगाबाद- ६३.८३ टक्के | नाशिक -६२.८५ टक्के |
| बीड - ६३.६२ टक्के | उस्मानाबाद- ६१.५९ टक्के |
| भंडारा- ६८.८८ टक्के | पालघर- ६२.३१ टक्के |
| बुलडाणा-६५.८४ टक्के | परभणी- ६५.७३ टक्के |
| चंद्रपूर- ६७.४८ टक्के | पुणे - ५७.०९ टक्के |
| धुळे - ६२.७५ टक्के | रायगड - ६४.०१ टक्के |
| गडचिरोली-७२.६३ टक्के | रत्नागिरी- ६३.३५ टक्के |
| गोंदिया -६८.०९ टक्के | सांगली - ६६.२८ टक्के |
| हिंगोली - ६४.१८ टक्के | सातारा - ६७.१६ टक्के |
| जळगाव - ५७.६९ टक्के | सिंधुदुर्ग - ६५.०६ टक्के |
| जालना- ६७.१७ टक्के | सोलापूर -६०.०९ टक्के |
| कोल्हापूर- ७०.९७ टक्के | ठाणे - ५२.७६ टक्के, |
| लातूर - ६४.४३ टक्के | वर्धा - ६५.५० टक्के |
| मुंबई शहर- ५२.०७ टक्के | वाशिम - ६०.४२ टक्के |
| मुंबई उपनगर- ५३.७६ टक्के | यवतमाळ - ६३.२२ टक्के |

निवडणुकीला गालबोट बातम्या पान ५ वर

## अदानींवरील आरोप चुकीचे! पवारांचे मत मविआतील टोकाचे मतभेद चव्हाट्यावर



**मतदानाच्या आदल्या दिवशी अत्यंत मोक्याच्या क्षणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पुन्हा एकदा मविआतील उबाठाला जोरदार धक्का दिला. काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि शिवसेना ठाकरे गटाचे उद्धव ठाकरे यांनी आपल्या प्रचार सभेत अदानींना धारावी पुनर्विकासाचे कंत्राट देण्यास कडाडून विरोध केला असताना शरद पवार यांनी नेमकी विरुद्ध भूमिका मांडली. धारावी प्रकल्पावरून अदानींवर केले जाणारे आरोप चुकीचे आहेत,असे म्हणत शरद पवार यांनी महाविकास आघाडीलाच (मविआ) अडचणीत आणले.**

■ मुंबई

**काल** एका वेब पोर्टलला दिलेल्या मुलाखतीत पवार यांनी अदानींबाबतची आपली ही भूमिका मांडली. 'धारावी पुनर्विकास प्रकल्पावरून अदानी समूहावर केले जात असलेले आरोप चुकीचे आणि तथ्यहीन आहेत, असे माझे मत आहे. या पुनर्विकास प्रकल्पात सुरुवातीला संयुक्त अरब अमिरातीमधील (युएई) एका कंपनीने रस दाखविला होता. अदानींचा प्रवेश त्यानंतर झाला', असे शरद पवार म्हणाले.

पवारांनी मांडलेली ही भूमिका उद्धव ठाकरे आणि राहुल गांधी यांनी सातत्याने मांडलेल्या भूमिकेशी पूर्णपणे फारकत घेणारी आहे. सत्तेवर आल्यावर सर्वात आधी अदानी पुनर्विकास प्रकल्प रद्द करू, असे जाहीर आश्वासन ठाकरे आणि राहुल गांधी यांनी संपूर्ण प्रचारादरम्यान दिले. मात्र शरद पवार यांनी पूर्णपणे विरुध्द भूमिका घेतल्याने मविआतील घटक पक्षांमधील टोकाचे मतभेद चव्हाट्यावर आले. मविआसाठी हा फार मोठा धक्का ठरला तर भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुतीच्या हाती आयते कोलित लागले. शरद पवार यांच्या या वक्तव्यावर भाजपाचे माध्यम कक्षप्रमुख अमित मालविय यांनी एक्स पोस्ट करून बोचरी प्रतिक्रिया दिली. धारावी प्रकल्पावरून उद्धव ठाकरे आणि राहुल गांधी लोकांची दिशाभूल करीत आहेत, हे शरद पवार यांचे म्हणणे बरोबर आहे. कारण उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील मविआचे सरकार महाराष्ट्रात सत्तेवर असतानाच अदानी समूहाला धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे कंत्राट देण्यात आले होते, असे मालविय एक्स पोस्टमध्ये म्हणाले.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीच्या संपूर्ण प्रचारात उद्धव ठाकरे आणि राहुल गांधी हे अदानी समुहावर धारावी पुनर्विकास प्रकल्पावरून सातत्याने टीका करत असताना शरद पवार एकही शब्द बोलले नव्हते किंवा याविरोधात कोणतेही मत प्रदर्शन केले नव्हते. परंतु आता मतदानाच्या आदल्या दिवशी एका वेबसाईटला मुलाखत देऊन पवार यांनी मविआविरोधी भुमिका का घेतली, असा सवाल राजकीय वर्तुळात विचारला जातो.

## थोडक्यात...

### पोर्ट ट्रस्ट अतिरिक्त जमीन विकणार

**उरण -** जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट प्राधिकरण आपल्या विशेष आर्थिक क्षेत्रात असलेली अतिरिक्त जमीन विकणार आहे. या डिसेंबर महिन्यात या जमिनीसाठी लिलाव प्रक्रिया होणार आहे. ही जमीन उत्पादन क्षेत्रातील कंपन्यांना विकण्याला प्राधान्य देण्यात येणार असून, काही जमिनी सेवा क्षेत्रालाही देण्यात येणार आहेत.

याबाबत जेएनपीएचे अध्यक्ष उन्मेष वाघ यांनी सांगितले आहे की, आमच्याकडे विक्रीयोग्य १६५ हेक्टर जमीन असून, त्यातील २५ टक्के सुरुवातीला विकण्यात येणार आहे. या आधी गोदामांसाठी मोठ्या प्रमाणावर जमिनी देण्यात आल्या होत्या. आता आम्ही लहान उत्पादक आस्थापनांना व खास करून जे या बंदरावरून मालाची आयात-निर्यात करणार आहेत त्यांच्यासाठी या जागा देणार आहोत. ज्या भूखंडाच्या विक्रीसाठी हे लिलाव होणार आहेत, त्यात उत्पादन क्षेत्रातील कंपन्या व सेवा क्षेत्रातील कंपन्यांसाठीच्या भूखंडांचा समावेश आहे.

### बीडमध्ये अपक्ष उमेदवाराचा मतदान केंद्रातच मृत्यू



**बीड -** बीड विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार बाळासाहेब शिंदे यांचा मतदान केंद्रावरच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला. बाळासाहेब शिंदे मतदान सुरू झाल्यावर बीड शहरातील छत्रपती शाहू विद्यालयात असणाऱ्या मतदान केंद्रावर थांबले होते. यावेळी ते चक्कर येऊन खाली पडले. त्यांना बीड शहरातील काकू नाना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

## बारामतीत मतदान केंद्रावर प्रथमच पवार कुटुंबाचे एकमेकांवर आरोप

**मतपत्रिकांवर घड्याळाचे शिक्के**

■ बारामती

**बारामतीत** अजित पवार विरुद्ध पुतण्या युगेंद्र पवार असा सामना आहे. यावेळी युगेंद्र पवार यांच्या आई शर्मिला पवार यांनी महात्मा गांधी बालक मंदिर बूथमध्ये मतदारांना घड्याळाचे शिक्के असलेल्या स्लीपचे वाटप केल्याचा आरोप केला. त्याचबरोबर मतदान केंद्रात बोट दाखवून एक क्रमांकावर मतदान करा असे आतील एजंट सुचवित असल्याचा आरोप केला. पवार कुटुंबाने एकमेकांवर आरोप करण्याचा हा पहिलाच प्रकार असावा.

बारामतीमध्ये मतदान केंद्राच्या ठिकाणी युगेंद्र पवारांच्या मातोश्री शर्मिला



पवार यांनी मतदारांच्या नावाच्या चिठ्ठीवर घड्याळाचा शिक्का मारलेल्या स्लीप दाखवत म्हणाल्या की, मी इथे आल्यावर मला हे सापडले आहे. जे मतदार आले आहेत त्यांना चिठ्ठ्या दिल्या आहेत. त्यावर घड्याळाचा शिक्का मारलेला आहे. हे योग्य आहे का? आम्ही याबाबत तक्रार करणार आहे. माझ्यासमोर एका व्यक्तीने मतदान केंद्रावर दमदाटी केली. तो जणूकाही स्वत:च्या घरचे लग्न असल्यासारखे या, बसा वगैरे सांगत होता. पहिले बोट दाखवून मतदान करताना असे विचारताना एक नंबरला मत द्या असे प्रत्येकाला सुचवित होता. खाणाखुणा करून मतदारांशी बोलत होता. काय संकेत देत

पान ७ वर

## सुप्रिया सुळे, नाना पटोलेंवर गंभीर आरोपाची टेप बिटकॉईन विकून १५० कोटी निवडणुकीत वापरले

■ मुंबई

**विधानसभा** निवडणुकीच्या मतदानाच्या आदल्या दिवशी काल पुण्याचे माजी आयपीएस अधिकारी रविंद्रनाथ पाटील यांनी केलेल्या गौप्यस्फोटामुळे राजकीय वर्तुळात खळबळ माजली. राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे आणि काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी २०१८ साली झालेल्या क्रिप्टोकरन्सी घोटाळ्यात बिटकॉईन मिळवले आणि आतापर्यंत १५० कोटींचे बिटकॉईन देऊन ते पैसे



निवडणुकीसाठी वापरले. सुप्रिया सुळे यांनी हे सर्व आरोप फेटाळले. आरोप करणाऱ्याला आणि मला समोरासमोर बसवा, प्रश्न विचारा, मी उत्तर देते असे त्या म्हणाल्या.

पान ७ वर

**सुप्रिया सुळे, पटोलेंनी आरोप फेटाळले**

दरम्यान, पाटील यांनी केलेल्या या आरोपाचा राजकीय लाभ उठविण्यासाठी भाजपाचे प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी पत्रकार परिषदेत दोन ऑडिओ ऐकवून सुप्रिया सुळे आणि नाना पटोले यांच्यावर दीडशे कोटींच्या बिटकॉईन घोटाळ्याचा आरोप केला. मात्र त्रिवेदी यांचा आरोप सुप्रिया सुळे आणि पटोले यांनी फेटाळून लावला.क्लिपमध्ये जो आवाज ऐकू येत आहे तो माझा आवाज असूच शकत नाही, असे पटोले म्हणाले.

सुप्रिया सुळे यांनी तर त्रिवेदी यांच्यासह भाजपालाच आव्हान दिले. या विषयावर जाहीरपणे कोणत्याही ठिकाणी आणि तुमच्या कोणत्याही नेत्याबरोबर मी वादविवाद करायला तयार आहे. हिंमत असेल तर खुली चर्चा घ्या, असे आव्हान सुप्रिया सुळे यांनी दिले. त्याचबरोबर सुप्रिया सुळे यांनी त्रिवेदी यांच्या विरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आणि त्यांच्याविरूध्द अब्रुनुकसानीचा खटलाही दाखल केला.



## मोदी सरकार देशातील ४ सरकारी बँकांमधील हिस्सेदारी विकणार!

■ नवी दिल्ली

**देशातील** शेअर बाजार नियामकाने बंधनकारक केलेल्या पब्लिक शेअर होल्डिंग नियमांचे पालन करण्यासाठी मोदी सरकार चार सरकारी बँकांमधील काही हिस्सा विकण्याचा विचार करत आहे. सेंट्रल बँक ऑफ इंडिया, इंडियन ओव्हरसीज बँक, युको बँक आणि पंजाब अँड सिंध बँक अशी या चार बँकांची नावे आहेत.

या चार बँकांतील हिस्सा कमी करण्यासाठी येत्या काही महिन्यांत मंत्रिमंडळाची मंजुरी घेतली जाऊ शकते. या बातमीनंतर या चारही बँकांचे शेअर काल मंगळवारी ४ टक्क्यांहून अधिक वाढले. इंडियन ओव्हरसीज बँकेच्या

**लवकरच मंत्रिमंडळाची मंजुरी**

शेअरची किंमत काल ४.४ टक्क्यांनी वधारली, तर सेंट्रल बँक ऑफ इंडिया, युको बँक आणि पंजाब अँड सिंध बँकेचे शेअर ३ टक्क्यांहून अधिक वाढले.

बीएसईच्या वेबसाईटवरील आकडेवारीनुसार, सप्टेंबर अखेरपर्यंत सेंट्रल बँक ऑफ इंडियामध्ये भारत सरकारचा ९३ टक्क्यांहून अधिक हिस्सा होता. इंडियन ओव्हरसीज बँकेत ९६.४ टक्के, युको बँकेत ९५.४ टक्के आणि पंजाब अँड सिंध बँकेत ९८.३ टक्के हिस्सा सरकारकडे होता. ओपन मार्केट ऑफर फॉर सेलद्वारे (ओएफएस) हिस्सा विकण्याची योजना विचाराधीन असल्याचे सूत्रांनी सांगितले. सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) अंतर्गत लिस्टेड कंपन्यांना २५ टक्के सार्वजनिक भागभांडवल ठेवणे आवश्यक आहे.

## सायनमध्ये पोलिसांसोबत भाजपा नेत्यांची बाचाबाची

■ मुंबई

**सायन** कोळीवाड्यात मतदान केंद्रावर फक्त काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना सहकार्य करत असल्याचा आरोप करत भाजपा आमदार प्रसाद लाड आणि प्रवीण दरेकर यांनी आज दुपारी पोलिसांसोबत बाचाबाची केली. त्यामुळे एकच गोंधळ उडाला.

या घटनेनंतर दरेकर यांनी सांगितले की, मी सायन कोळीवाड्यामधील बुथला भेट देत होतो. तिथे आम्हाला पोलिसांनी अडवले. नितीन सोनकांबळे आणि पीएसआय रेश्मा पाटील हे पोलीस अधिकारी होते. उबाठाचे लोक बुथवर ये-जा करत होते. त्यांचा माजी नगरसेवकही ये-जा करत होता. सुपारी घ्यावी अशा पद्धतीने सोनकांबळे अत्यंत अर्वाच्य भाषेत आणि उर्मटपणे आमच्यासोबत बोलत होते. त्यामुळे आम्ही वडाळा पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

## विरार घटनेत कोणताही कट नाही विनोद तावडेंचे पुन्हा स्पष्टीकरण

■ मुंबई

**विरार** येथील पैसे वाटपाच्या संशयावरून घडलेल्या घटनेत कोणतेही कटकारस्थान नाही. हा प्रकार केवळ गैरसमजुतीतून घडल्याचे स्पष्टीकरण भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी आज पुन्हा दिले. मुंबईत मतदानाचा हक्क बजावल्यानंतर ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

यावेळी ते म्हणाले की, मी तिथे जाणार आहे याची कल्पना कोणालाही नव्हती. मी वाडा येथून येत असताना राजन नाईक यांना फोन करून प्रचाराबाबतची विचारणा केली. त्यावेळी त्यांनी मला चहासाठी बोलावले म्हणून मी तिथे जाण्याचा निर्णय आयत्यावेळी घेतला. त्यावर कोणीतरी हितेंद्र ठाकूर यांना मी येतोय हे सांगणे म्हणजे ते खोटे बोलत आहेत. पोलीस व निवडणूक आयोगालाही यात काहीही सापडलेले नाही. मी तिथे जे काही बोललो त्याचे रेकॉर्डिंग आहे. काल झालेल्या गोंधळाचा फायदा घेण्याचा हा विरोधी पक्षाचा प्रयत्न आहे. दुसरे काही नाही. संजय राऊत म्हणतात तसे काही नाही. मी जाणार आहे याची कल्पना मलाही नव्हती. हा केवळ एक गैरसमजुतीतून घडलेला प्रकार आहे.

## सालेम २०३० पर्यंत तुरुंगातच सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

■ नवी दिल्ली

कुख्यात गँगस्टर अबु सालेम हा २०३० पर्यंत तुरुंगातच राहणार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांवरून स्पष्ट झाले आहे. प्रत्यार्पणाच्या वेळी अबु सालेमची शिक्षा २५ वर्षांपेक्षा अधिक नसेल असे भारत सरकारने पोर्तुगालला सांगितले होते. त्यानुसार त्याची २५ वर्षे पूर्ण झाल्यावरच त्याच्या सुटकेचा निर्णय घेण्यात येईल, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते.

आपल्याला पोर्तुगालमध्ये २००२ साली ताब्यात घेण्यात आले होते. त्यामुळे आपली शिक्षा २०२७ मध्ये संपत असून, तेव्हा आपली सुटका करावी अशी मागणी सालेमने सर्वोच्च न्यायालयात केली होती. यावर सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, सालेम याला २००५ साली भारतात आणले. त्यामुळे त्याच्या शिक्षेची मुदत २०३० मध्ये संपत आहे. सालेम याचे प्रत्यार्पण करताना त्याला फाशी देण्यात येणार नाही. त्याचप्रमाणे २५ वर्षांपेक्षा अधिक शिक्षा होणार नाही, असे भारत सरकारने सांगितले होते.

## राज्य सरकारला आरक्षण देण्याचा पूर्ण अधिकार

■ मुंबई

**राज्य** सरकारला कोणत्याही समाजास आरक्षण देण्याचा पूर्ण अधिकार आहे, तसेच सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण फेटाळल्यानंतर विशिष्ट समाजाला आरक्षण देण्याबाबत विधिमंडळास पुन्हा कायदा करण्यास प्रतिबंध केलेला नाही, असा युक्तिवाद काल सरकारच्या वतीने महाधिवक्ता वीरेंद्र सराफ यांनी उच्च न्यायालयात केला आणि मराठा आरक्षणाचे जोरदार समर्थन केले. ॲड. सराफ यांचा युक्तिवाद अपूर्ण राहिल्याने यावरील सुनावणी आता ५ डिसेंबरला निश्चित करण्यात आली आहे.

मराठा समाजाला सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गातून १० टक्के आरक्षण देण्याचा

**महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांचा युक्तिवाद**

निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या निर्णयाविरोधात आणि कायद्याच्या वैधतेला आव्हान देत ॲड. जयश्री पाटील आणि अन्य यांनी केलेल्या रिट याचिकांसह १८ याचिका दाखल केल्या आहेत. या याचिकांवरील एकत्रित सुनावणी मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय, न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती फिरदोष पुनिवाला यांच्यासमोर सुरू आहे. यावेळी महाधिवक्ता सराफ यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, एखाद्या समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात जातनिहाय सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याचा आणि सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण फेटाळल्यानंतरही विशिष्ट समाजाला आरक्षण देण्यासंबंधी विधिमंडळाला पुन्हा कायदा करण्यास प्रतिबंध केलेला नाही. त्यामुळे राज्य सरकारला आरक्षण देण्याचा अधिकार आहे.

## एअरसेल-मॅक्सिस प्रकरणी पी.चिदंबरम यांना दिलासा

■ नवी दिल्ली

माजी अर्थमंत्री पी. चिदंबरम व त्यांचे पुत्र कार्ती चिदंबरम यांना दिल्ली उच्च न्यायालयाने दिलासा दिला आहे. सक्तवसुली संचालनालयाने (ईडी)एअरसेल - मॅक्सिस प्रकरणी दिल्लीच्या स्थानिक न्यायालयात दाखल केलेल्या खटल्यात कोणतीही कारवाई करण्यास स्थगिती दिली. याप्रकरणी उच्च न्यायालयाने ईडीला नोटीस बजावली असून त्यांच्याकडे चिदंबरम यांच्या याचिकेवर उत्तर मागितले आहे.

कार्ती चिदंबरम यांच्यावर शीना बोरा हत्याकांडातील आरोपी पीटर मुखर्जी आणि इंद्राणी मुखर्जी यांच्या आयएनएक्स मीडिया या कंपनीला २००७मध्ये नियमापेक्षा अधिक विदेशी गुंतवणूक मिळवून दिल्याचा आरोप आहे. कंपनीला फक्त ४.६२ कोटींची विदेश गुंतवणूक स्विकारण्याची परवानगी असताना त्यांनी ३०५ कोटी रुपये उभे केले होते. कार्ती चिदंबरम यांनी आपल्या वडिलांच्या पदाचा गैरवापर केल्याचा आरोपही करण्यात आला होता.

# छोट्या जाहिराती

**संपर्क करा**
**८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

### पाहिजेत

HDFC बँकेत मुले मुली पाहिजेत पगार 17500-35500 डायरेक्ट भरती. संपर्क **9067849017** {NC243161}

हेल्थकेअर कंपनीमध्ये हेल्पर, पॅकिंगसाठी महिला आणि पुरुष, मुली आणि मुले पाहिजे शिक्षण वयाची अट नाही संपर्क:- **7738372055/ 7506121314 SALARY 19900**{NC243051}

(24 तास) घरकामासाठी, बेबीकेअर, कुकींगसाठी अनुभवी ''बायका/मुली'' पाहिजेत. पगार (18,000-40,000) रंजीतसर **9321417007 / 9892575886** {NC243129}

₹ 200 प्रति तास घरकामे (झाडू, फरशी, भांडी, कपडे वाळत घालणे इ.) तुमच्या घराच्या जवळ रोज कामे मिळतील. फक्त महिलांसाठी. सकाळी 10:00 ते संध्याकाळी 7:00 संपर्क :- **9372496984** {NC243213}

अंधेरी सिप्झमध्ये ITI पास फिटर आणि इलेक्ट्रिशियन पाहिजेत. पगार 18,000/- संपर्क - **8169014720** {NC243261}

सुवर्णसंधी निवृत्त झालेल्या -पोलीस/ सैन्य, ज्येष्ठ, गृहिणी. वेतन+ सवलती. **91675 43240** {NC243260}

इमिटेशन ज्वेलरीच्या कामासाठी मुली पाहिजेत. कांदिवली पूर्व, संपर्क - **9619485981** {NC243262}

मुंबईमध्ये पेशंटकेअरसाठी मुले, मुली, पुरुष, बायका पाहिजेत. पगार (18,000-72,000) **9820628009 / 9833470117** {NC243245}

इलेक्ट्रॉनिक कंपनीला सोल्डरींगच्या कामासाठी असेंब्लर्स मुले, मुली, हेल्पर पाहिजेत. भेटा सकाळी 10:00 ते 5:00 अंबर, 107, योगी इंडस्ट्रियल इस्टेट, राम मंदिर रोड (पश्चिम), फोनः **022-40039156** {NC243273}

### पाहिजेत

बोरिवली येथे ऑफिस कामासाठी टेलिकॉलर, हाऊसकिपिंग पाहिजेत. संपर्कः **8452037238** {NC243309}

जास्त संख्या मध्ये पाहिजेत मीरा रोडसाठी सिक्युरिटी गार्ड्स, लेडी सिक्युरिटी गार्ड्स, सिक्युरिटी सुपरवायझर, सिक्युरिटी इन्चार्ज, आकर्षक पगार (बायोडाटा, आधार कार्ड, पॅनकार्ड) कागदपत्रासहित त्वरीत संपर्क करा. बक्षी सिक्युरिटी **. 022-40272125 / 129** Email Id: bakshi2001security@hotmail.com {NC243270}

SBI बँकेत ऑफिस कामासाठी लोकांची भर्ती. 15000/- ते 35,000/- **9702279241** {NC242983}

**पाहिजेत**
**स्मार्ट लेडीज**
**नवीन ऑफिससाठी पाहिजेत**
**ऑफीस असिस्टंट**
पगार- १२,०००/- ते २०,०००/- शिक्षण १२वी, ग्रॅज्युएट, वय २० ते ३० वर्षे, कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक.
**असिस्टंट मॅनेजर**
पगार- २५,०००/- ते ४५,०००/- इंग्लिशमध्ये बोलण्याचे ज्ञान आवश्यक. (फ्ल्युंट इंग्लिश) शिक्षण १२वी, ग्रॅज्युएट, वय २२ ते ३० वर्षे कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. कागदपत्रासह भेटा
**कामोठे, पनवेल**
**मो.- 7397969039**

बोरीवली (पूर्व) पॅकेंजिंग/ गोडाऊनमध्ये फ्रेशर मुलेकरिता जागा रिकामी आहे. पगार 10,500/- (वय 18 ते 40) **8655188552** {NC243275}

अंधेरी येथे ऑफिसमध्ये पार्टटाईम हेल्पर पाहिजे. पगार 9000 फोन - **9029985564** {NC243133}

FLAG SECURITY पाहिजेत सिक्युरिटीगार्डस 20,000/- + 4 सुट्टी (ड्युटी 12 तास) परेलकरिता. 307, माहिम इंडस्ट्रीयल इस्टेट, खिलनानी हायस्कुल, माहिम वेस्ट, फोन - **8379929529 / 02262013999** {NC243278}

### पाहिजेत

घरकामासाठी महिला-मुली/मुले (भरपूर पगार) (राहण्या-खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC243059}

फ्रेशर मुलीसाठी जागा रिकामी आहे. बोरीवली स्टेशनजवळ, पगार 10,000/- (वय 18 ते 40) **8655188552** {NC243276}

संपूर्ण मुंबईमध्ये सुरक्षा गार्डसाठी पुरुष, महिला अर्जंट पाहिजेत. पगार 21500-28500 अंधेरी (ईस्ट), **9819544186** {NC243281}

पाहिजेत मुंबईसाठी सुरक्षारक्षक, १२ तास ड्युटी पगार २०,०००/- संपर्क **9503601971 / 9167630931** {NC243320}

झेरॉक्स मशीनकरिता माणूस पाहिजे. राज ग्राफिक्स मस्जिदबंदर पश्चिम संपर्क : **9987357112** {NC243319}

पाहिजेत डोंबिवली पूर्व स्टेशन समोर ऑपरेशन थिएटर, टेक्निशियन, नर्स, टेलिकॉलर, आया मावशी, अकाऊंटंट : **9167483577** {NC243318}

प्लम्बिंगसाठी अनुभवी सुपरवायझर पाहिजे पगार 20000 ते 40000 info@aquascapeworld.com - **9892510002** {NC243313}

घरकाम/बेबीकेअरसाठी (10/12 तास) पवई, परेल, माहिम, घाटकोपर, मुलुंड विक्रोळीसाठी अनुभवी जवळपास राहणारे (बायका/मुली) त्वरित पाहिजेत. पगार 16,000/- ते 20,000/- **9892575886** {NC243314}

गोरेगावमध्ये मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह/ फिमेल ऑफिस असिस्टंट पाहिजे- **8055772679 / 9320176123** {NC243315}

मेडिकल डिवाइस कंपनीमध्ये दिवस / रात्र ऑफिस कामासाठी मुले/मुली पाहिजेत. 30 वर्षा पेक्षा कमी. इंटरव्यू : आज ,12 ते 6 पत्ता - रेस्पिटेक हेल्थकेयर बिल्डिंग नं. 49, रूम नं. 2330, MIG क्रिकेट क्लबच्या समोर, गांधीनगर, वांद्रे (पूर्व) मुंबई 400051. संपर्क : **8108104581** {NC243316}

महिला पुरुष सीएसएमटीला जबाबदारीचे स्वंतत्रपणे व्यवसाय सांभाळणारे पगार 30,000 **8657438844, 9076103969** {NC243317}

### व्यवसायविषयक

यशस्वी उद्योजक बना. दिवसा 3000/- कमवा. अनिरुद्धा दादर- **9967437950** विरार- **8652643434** {NC243049}

महिला/मुलींना महिन्याला 30000 रुपये कमवून देणारा ज्वेलरी बिजनेस **7738657263** {NC243283}

### वर पाहिजे

सुंदर गरीब वधु २८, उंची ५.३ शिक्षण १२वी पास शिवण काम-ब्युटीपार्लरची कामे करते प्रतिमहा १५,०००/- मुलगा निर्व्यसनी समजदार हवा जातीची-शिक्षणाची अट नाही. त्वरित विवाह करणे आहे. **7218568997** {NC243312}


# हजार रुपयांच्या भांडवलावर उभारला लाखोंचा व्यवसाय

**आयुष्यात अचानक आलेल्या संकटांनी खचून न जाता उलट या संकटांना खंबीरपणे सामोरे गेले तर आयुष्य कसे बदलू शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे बिहारमधील एका छोट्याशा गावात राहणाऱ्या ४९ वर्षांच्या अपर्णा मिश्रा यांची कहाणी. आपल्या कुटुंबाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी धडपडणाऱ्या अपर्णा यांचे काम गावातील इतर महिलांसाठी नकळतपणे वरदान ठरले.**



इतर असंख्य गृहिणींप्रमाणे, अपर्णा समस्तीपूर जिल्ह्यातील बेदौलिया गावात कुटुंबासोबत राहत होत्या. त्यांचा नवरा खाजगी कंपनीत नोकरीला असल्याने त्याच्या पगारात दोन मुलींच्या शिक्षणाचा आणि घरचा इतर सगळा खर्च भागत असे. अपर्णा आणि तिचे कुटुंब गडगंज श्रीमंत नव्हते पण घरी येणाऱ्या पैशात समाधानी होते. २००८ साली मात्र त्यांच्या या सुखी संसाराला जणू ग्रहण लागले. २००८ मध्ये आलेल्या जागतिक मंदीचा फटका त्यांच्या नवऱ्याच्या कंपनीलाही बसला आणि कंपनी बंद पडली. या धक्क्याने अपर्णा यांच्या नवऱ्याला नैराश्याने ग्रासले. आपल्या वडिलांची अवस्था बघून त्यांची मोठी मुलगी, आद्या मिश्रा आजारी पडली आणि घरची परिस्थिती आणखीनच बिघडली. घरात आता आर्थिक स्रोत नसल्याने आद्याला झालेल्या गंभीर आजाराच्या उपचाराचा खर्च त्यांना परवडणारा नव्हता. त्यामुळे शेवटी त्यांना नावावर असलेली सगळी मालमत्ता विकावी लागली.

'माझे पती त्यावेळी बेरोजगार होते आणि उत्पन्नाचे कोणतेही साधन आमच्याकडे नव्हते, त्यात आमच्या मुलीच्या उपचाराचा खर्च भागवणे अत्यंत अवघड झाले होते. माझ्या सुखी संसाराची आणि कुटुंबीयांची झालेली वाताहत पाहून मला किती मानसिक त्रासातून जावे लागले हे शब्दात सांगणे कठीण आहे. या परिस्थितीला कंटाळून मी एकदा आत्महत्या करून जीवन संपवण्याचा विचार केला होता. पण, माझ्यासाठी नशिबात काहीतरी वेगळेच लिहिले होते.' असे अपर्णा सांगतात.

अपर्णा परिस्थितीमुळे पूर्णपणे खचल्या होत्या, नवऱ्याला दुसरी नोकरी मिळेल अशी त्याची मानसिक अवस्था नव्हती, मुलीच्या उपचारासाठी लागणारा खर्च वाढतच होता. अशावेळी त्यांच्या घराशेजारी राहणाऱ्या एका आयुर्वेदिक वैद्यांनी मुलीच्या उपचारांसाठी पारंपरिक आयुर्वेदिक पद्धतींचा शोध घेण्याचा सल्ला दिला. महागड्या औषधांसाठी पैसे नसल्यामुळे अपर्णा आयुर्वेदिक उपचारांकडे वळल्या. वैद्यांनी आद्यासाठी काही गोळ्या आणि 'च्यवनप्राश' दिले. आद्याच्या तब्येतीत सुधारणा होऊ लागल्याने अपर्णाचा या उपचारपद्धतीवर अधिक विश्वास बसला. परंतु सारखे 'च्यवनप्राश' आणणेही अपर्णाला महाग पडू लागले.

पैशांच्या अभावी आद्याला च्यवनप्राश देणे बंद करणे त्यांच्या मनाला पटेनासे झाले आणि मग अपर्णाच्या डोक्यात एक भन्नाट कल्पना आली. वैद्य ज्याप्रमाणे घरच्या घरी च्यवनप्राश बनवून रुग्णांना देतात त्याप्रमाणे आपणही घरीच च्यवनप्राश बनवले तर पैसेही लागणार नाहीत आणि मुलीच्या तब्येतीतही सुधारणा होईल असा विचार त्यांनी केला. वैद्यांकडे जाऊन अपर्णाने आयुर्वेदिक उपचारातील बारकावे शिकून घेतले, च्यवनप्राश घरीच कसे बनवायचे याची शिकवणी घेतली आणि घरीच 'च्यवनप्राश' बनवण्यास त्यांनी सुरुवात केली.

आद्यासाठी लागणारे च्यवनप्राश अपर्णा आता सहज घरी बनवू लागल्या. आद्या बरी झाल्यावर तिच्यासारख्या इतर अनेकांना हे च्यवनप्राश उपयोगी पडेल असा विचार करत अपर्णाने च्यवनप्राश विकण्याचा व्यवसाय सुरू करण्याचा निश्चय केला. पण भांडवल हा पुन्हा एक मोठा अडथळा होताच. अपर्णाकडे घरी फक्त एक हजार रुपये शिल्लक होते. या एक हजार रुपयांच्या भांडवलावर त्यांनी आपल्या व्यवसायाची सुरुवात केली. लोकांपर्यंत उत्पादन घेऊन जायचे तर जाहिरात करणे गरजेचे होते. जाहिरातीसाठी लागणारा पैसाही त्यांच्याकडे नव्हता. मग त्यांनी शक्कल लढवली आणि घरी येणाऱ्या पाहुण्यांना चहाऐवजी च्यवनप्राश देण्यास सुरुवात केली. च्यवनप्राशची चव आवडल्यास ऑर्डर देण्यास आणि इतर ओळखीच्या लोकांना याची माहिती देण्यास त्या सांगू लागल्या. बाजारात उपलब्ध असलेल्या उत्पादनांपेक्षा या घरगुती च्यवनप्राशची चव वेगळी असल्याने लोकांना ती खूप आवडली.

अपर्णाच्या च्यवनप्राशची चर्चा होऊ लागली आणि नातेवाईक, आसपास राहणारे ओळखीचे अनेक लोक घरी येऊन ऑर्डर देऊ लागले. या घरगुती च्यवनप्राशची मागणी वाढू लागली. आज अपर्णाचा ग्राहक वर्ग राज्याच्या आणि देशाच्या पलीकडेही विस्तारला आहे. एकेकाळी मुलीच्या औषधोपचारासाठी पैसे नसलेल्या अपर्णा यांनी गावातील १५ कामगारांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे आणि केवळ एक हजार रुपयांच्या भांडवलावर सुरू केलेल्या या छोट्या व्यवसायाचे वार्षिक उत्पन्न आज २५ लाखाच्या पुढे गेले आहे.

# मॉर्निंग वॉक करूनच डेक्कन मतदार मतदान करायला गेले

■ पुणे

पुण्यातील डेक्कन परिसरातील अनेक मतदारांनी आज पहाटेच्या वेळी मॉर्निंग वॉक करून तिथूनच मतदान केंद्र गाठले. तर धनराज कालगी नावाचे मतदार सर्वप्रथम मतदान करण्यासाठी अर्धा तास आधीच मतदान केंद्रावर पोहोचले.

आज सकाळी मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडलेल्या असंख्य नागरिकांनी घरी परतत असतानाच केंद्रावर जात मतदान केल्याचे चित्र डेक्कन परिसरातील अनेक मतदान केंद्रांवर दिसले. हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालयांत शिक्षक असलेल्या धनराज कालगी यांनी आपटे रस्त्यावरील लक्ष्मणराव आपटे प्रशालेतील मतदान केंद्रावर सर्वप्रथम मतदान केले.

केंद्रावर सर्वप्रथम मतदान करायला संधी मिळावी, यासाठी ते सकाळी साडेसहा वाजता केंद्रावर पोहोचले. कालगी म्हणाले की, नंतर गर्दीत थांबावे लागू नये यासाठी मी लवकर येऊन मतदान केले. याप्रकारे मतदान केंद्रावर सर्वप्रथम येऊन मतदान करण्याची ही माझी तिसरी वेळ आहे.

# मतदानाचा हक्क बजावताना खंडाळ्यातील मतदाराचा मृत्यू

■ सातारा

खंडाळ्यातील मोरवे गावात मतदानाचा हक्क बजावतानाच ६७ वर्षीय मतदानकर्त्याचा जागीच मृत्यू झाला. शाम धायगुडे असे मतदानकर्त्याचे नाव आहे. मतदान करतानाच अचानक चक्कर आल्याने जागेवरच कोसळले. नातेवाईकांसह कार्यकर्त्यांनी तातडीने त्यांना जवळील रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच त्यांचा हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. उत्तरीय तपासणीनंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. या घटनेमुळे परिसरात एकच हळहळ व्यक्त केली.

# वर्ध्यात 'कराळे गुरुजीं'ना मारहाण

■ वर्धा

वर्ध्याच्या उमरी मेघे गावात भाजपाच्या कार्यकर्त्यांनी मारहाण केल्याचा आरोप शरद पवार गटाचे प्रदेश प्रवक्ते नितेश कराळे यांनी केला. नितेश कराळे सोशल मीडियावर कराळे गुरुजी म्हणून प्रसिद्ध आहेत. विधानसभा निवडणुकीत कराळे प्रचार करत होते. ते आपल्या घरी जात असताना त्यांना काही जणांनी त्यांना थांबवले. त्यानंतर उमरी मेघेचे उपसरपंच कोसे यांनी त्यांना मारहाण केली. या मारहाणीचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. या मारहाणीनंतर भाजपा उमेदवार पंकज भोयर आणि काँग्रेस उमेदवार शेखर शेंडे यांच्यात वाद झाला. त्यामुळे गावात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या मारहाणीनंतर नितेश कराळे यांनी महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांसह सावंगी पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार केली.

### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**

# राशी भविष्य

गुरुवार, दि. २१ नोव्हेंबर २०२४ — संजय मनोहर

**मेष** – शासनाच्या कामासाठी दिलेली आश्वासने फसवी ठरतील. गरजूंना मदत करू शकाल. प्रवासात ओळखीच्या व्यक्तींची मदत मिळेल.

**वृषभ** – प्रिय व्यक्ती मनासारखी वागत नसल्याने मनात खंत जाणवेल. घरात धार्मिक वातावरणाने प्रसन्नता निर्माण होईल. वैयक्तिक कला, छंद जोपासाल.

**मिथुन** – व्यवहारात सावधानता बाळगणे आवश्यक ठरेल. प्रतिष्ठित व्यक्तींची ओळख उपयोगी पडेल. आपल्या बोलण्याने इतर दुखावले जाणार नाहीत, याची काळजी घ्यावी.

**कर्क** – नोकरी, व्यवसायात हितशत्रूंचा त्रास संभवतो. अधिकच्या खर्चाने तणाव जाणवेल. प्रवास आनंद देणारे ठरतील.

**सिंह** – नोकरीतील बदल आर्थिक फायदा वाढवेल. कौटुंबिक तणातणावापासून दूर जाण्यापेक्षा मार्ग काढणे उपयोगी ठरेल. जुनी न्यायालयीन कामे मार्गी लागतील.

**कन्या** – संततीस त्यांच्या कार्यक्षेत्रात घवघवीत यश मिळेल. दुसऱ्याच्या गोष्टी पटवून देताना आग्रह करू नये. संयमाने अडचणींवर मात करू शकाल.

**तूळ** – घरातील जुन्या नव्या पिढीमध्ये वैचारिक मतभिन्नता निर्माण होईल. स्वतःच्या मर्यादा समजावून वागणे आवश्यक आहे. काहींना अचानक धनलाभाचे योग.

**वृश्चिक** – कौटुंबिक सुखाच्या दृष्टीने उत्तम ग्रहमान. तुमच्या यशामुळे दुखवणारे लोक दूर ठेवणे गरजेचे राहील. मनातील विचार, संकल्पना कृतीत आणू शकाल.

**धनु** – नोकरीत वरिष्ठांचे कनिष्ठांचे उत्तम सहकार्य लाभेल. कर्तव्य करत रहावे, इतरांना उपदेशाचे डोस देऊ नये. अतिविचारांने मानसिक स्वास्थ्य बिघडेल.

**मकर** – मित्रांचे सल्ले घेण्याच्या भानगडीत पडू नये. क्षमतेपेक्षा अधिक धाडस अंगाशी येईल. संततीच्या बाबतीत काही बिनसू नये, यासाठी अधिक काळजी घ्यावी.

**कुंभ** – तरुणांना स्वतःतील उणिवा शोधणे भाग पडेल. मित्र, नातेवाईकांना दिलेला शब्द पाळू शकाल. निर्णय घेण्याबाबतीत अस्थिरता संपेल.

**मीन** – गुरुकृपा लाभेल. ऐन वेळेस पैशाची सोय होईल. मनातील इच्छांना मार्ग सापडेल.

# शुभ राशी दि. २१/११/२०२४

| | | |
|---|---|---|
| १ | २ | ७ |
| १० | २० | ७० |
| १५ | २५ | ७५ |
| १२८ | १३८ | ३४० |
| ४७० | ३४५ | ४५८ |

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी बुध विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 47 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 20/11/2024

| मालिका | GL-00 | GL-01 | GL-02 | GL-03 | GL-04 |
|---|---|---|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | 9101 | 9305 | 8658 | 2115 | 5195 (श्री गुरुदेव दत्त लॉटरी एजन्सी - पुणे) |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2015 | 9073 | | | | | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 2682 | 3216 | 3863 | 5435 (श्री अष्टविनायक लॉटरी, औरंगाबाद) | 6811 (महाराजा असोसिएट्स, इचलकरंजी) | | | | | |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0197 | 0422 | 0988 | 4042 | 5108 | 5255 | 6285 | 6616 | 7048 | 8528 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0538 | 1551 | 1639 | 4787 | 5232 | 6089 | 6246 | 7320 | 8732 | 9590 |

सहावे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0615 | 1490 | 2332 | 3347 | 4040 | 5036 | 5738 | 6846 | 8044 | 8863 |
| | 0626 | 1518 | 2378 | 3353 | 4144 | 5054 | 5795 | 6873 | 8078 | 9061 |
| 0009 | 0880 | 1641 | 2381 | 3357 | 4158 | 5057 | 5812 | 6893 | 8090 | 9084 |
| 0065 | 0884 | 1707 | 2409 | 3372 | 4240 | 5082 | 5860 | 6926 | 8195 | 9099 |
| 0103 | 0896 | 1737 | 2412 | 3377 | 4241 | 5192 | 5955 | 7017 | 8288 | 9168 |
| 0157 | 0952 | 1781 | 2413 | 3378 | 4274 | 5225 | 6003 | 7070 | 8292 | 9193 |
| 0190 | 0975 | 1791 | 2558 | 3385 | 4343 | 5285 | 6126 | 7216 | 8339 | 9337 |
| 0242 | 1008 | 1842 | 2575 | 3386 | 4413 | 5320 | 6142 | 7270 | 8394 | 9361 |
| 0280 | 1016 | 1945 | 2589 | 3392 | 4434 | 5345 | 6177 | 7287 | 8407 | 9491 |
| 0290 | 1035 | 2002 | 2669 | 3445 | 4441 | 5542 | 6254 | 7601 | 8481 | 9574 |
| 0321 | 1110 | 2027 | 2673 | 3469 | 4463 | 5561 | 6396 | 7653 | 8489 | 9655 |
| 0322 | 1154 | 2097 | 2674 | 3503 | 4514 | 5564 | 6436 | 7689 | 8579 | 9790 |
| 0340 | 1179 | 2191 | 2692 | 3730 | 4740 | 5585 | 6449 | 7700 | 8584 | 9849 |
| 0379 | 1183 | 2206 | 2829 | 3788 | 4828 | 5587 | 6574 | 7722 | 8664 | 9901 |
| 0392 | 1184 | 2220 | 3012 | 3801 | 4857 | 5588 | 6685 | 7742 | 8689 | 9912 |
| 0402 | 1248 | 2233 | 3027 | 3823 | 4873 | 5612 | 6759 | 7757 | 8779 | 9940 |
| 0420 | 1273 | 2239 | 3199 | 3873 | 4920 | 5651 | 6779 | 7800 | 8829 | 9977 |
| 0505 | 1383 | 2280 | 3238 | 3934 | 4937 | 5685 | 6786 | 7964 | 8853 | 9993 |
| 0590 | 1434 | 2292 | 3338 | 3954 | 4966 | 5710 | 6809 | 8028 | 8854 | 9994 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र सह्याद्री — विजयालक्ष्मी विकली लॉटरी — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 47 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 20/11/2024

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **SV-02 : 2582**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **4264**

तिसरे बक्षिस रु. 2000/- — **1569** (चिराग एन्टरप्रायझेस, नाशिक) | **1715** (किशोर लॉटरी सेंटर, सांगली) | **5402**

चौथे बक्षीस रु. 700/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1052 | 1589 | 2949 | 4127 | 5146 |
| 1164 | 1602 | 3030 | 4210 | 5155 |
| 1196 | 1915 | 3134 | 4385 | 5184 |
| 1285 | 2021 | 3350 | 4403 | 5403 |
| 1295 | 2064 | 3353 | 4460 | 5411 |
| 1398 | 2100 | 3432 | 4672 | 5446 |
| 1476 | 2234 | 3763 | 4784 | 5795 |
| 1545 | 2921 | 3809 | 4878 | 5823 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र अक्षय विकली लॉटरी

सोडत दर बुधवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 47 • सोडत दिनांक 20/11/2024

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख — **AK-03 : 5879** — श्री गुरुदेव दत्त लॉटरी एजन्सी - पुणे

उत्तेजनार्थ बक्षिस रु. 5000/- — पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी **5879** — अंबिका एजन्सी - दादर, मुंबई; किशोर लॉटरी सेंटर, सांगली; श्री अष्टविनायक लॉटरी - औरंगाबाद; श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1608 | 4788 | 5133 | 5219 | 6027 | 6727 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 2489 | 2518 | 4682 | 5296 | 5383 | 6956 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1745 | 2416 | 3495 | 3900 | 4683 | 4742 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1153 | 2853 | 3488 | 4466 | 4759 | 5996 |

सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2002 | 2443 | 3034 | 3361 | 3778 | 4204 | 4521 | 4988 | 5279 | 5745 | 6073 | 6645 |
| | | 2011 | 2465 | 3047 | 3364 | 3804 | 4222 | 4540 | 4996 | 5280 | 5756 | 6074 | 6646 |
| 1012 | 1473 | 2025 | 2492 | 3067 | 3370 | 3807 | 4229 | 4559 | 4999 | 5300 | 5757 | 6076 | 6657 |
| 1013 | 1482 | 2029 | 2498 | 3073 | 3371 | 3824 | 4259 | 4570 | 5004 | 5309 | 5785 | 6096 | 6659 |
| 1019 | 1491 | 2049 | 2500 | 3088 | 3373 | 3830 | 4280 | 4595 | 5007 | 5331 | 5801 | 6121 | 6661 |
| 1036 | 1502 | 2052 | 2506 | 3100 | 3379 | 3831 | 4291 | 4599 | 5035 | 5337 | 5806 | 6144 | 6665 |
| 1064 | 1511 | 2053 | 2522 | 3107 | 3381 | 3835 | 4298 | 4603 | 5043 | 5381 | 5808 | 6167 | 6683 |
| 1065 | 1514 | 2110 | 2546 | 3115 | 3382 | 3838 | 4304 | 4634 | 5045 | 5385 | 5810 | 6176 | 6688 |
| 1086 | 1530 | 2130 | 2561 | 3118 | 3383 | 3839 | 4324 | 4641 | 5055 | 5395 | 5819 | 6189 | 6707 |
| 1099 | 1534 | 2147 | 2578 | 3138 | 3425 | 3856 | 4347 | 4647 | 5059 | 5412 | 5826 | 6190 | 6708 |
| 1112 | 1564 | 2151 | 2585 | 3155 | 3430 | 3903 | 4355 | 4659 | 5060 | 5436 | 5827 | 6211 | 6711 |
| 1115 | 1566 | 2220 | 2611 | 3159 | 3431 | 3921 | 4357 | 4663 | 5083 | 5453 | 5828 | 6232 | 6760 |
| 1117 | 1601 | 2223 | 2612 | 3198 | 3461 | 3932 | 4376 | 4667 | 5089 | 5455 | 5852 | 6256 | 6761 |
| 1120 | 1604 | 2231 | 2633 | 3203 | 3463 | 3937 | 4380 | 4676 | 5099 | 5457 | 5858 | 6286 | 6763 |
| 1130 | 1612 | 2236 | 2652 | 3212 | 3473 | 3946 | 4397 | 4684 | 5103 | 5480 | 5864 | 6298 | 6765 |
| 1137 | 1618 | 2250 | 2677 | 3218 | 3483 | 3960 | 4398 | 4694 | 5105 | 5504 | 5866 | 6319 | 6773 |
| 1141 | 1643 | 2255 | 2679 | 3227 | 3484 | 3983 | 4399 | 4708 | 5106 | 5505 | 5869 | 6364 | 6776 |
| 1149 | 1665 | 2256 | 2680 | 3237 | 3513 | 3985 | 4400 | 4738 | 5135 | 5506 | 5881 | 6366 | 6788 |
| 1176 | 1711 | 2272 | 2683 | 3245 | 3521 | 4004 | 4401 | 4749 | 5137 | 5507 | 5887 | 6376 | 6791 |
| 1178 | 1778 | 2280 | 2692 | 3250 | 3533 | 4011 | 4412 | 4755 | 5139 | 5518 | 5895 | 6404 | 6814 |
| 1180 | 1797 | 2282 | 2712 | 3253 | 3553 | 4039 | 4417 | 4758 | 5147 | 5519 | 5898 | 6421 | 6827 |
| 1186 | 1806 | 2294 | 2723 | 3274 | 3573 | 4040 | 4421 | 4774 | 5152 | 5526 | 5906 | 6423 | 6837 |
| 1188 | 1823 | 2295 | 2725 | 3283 | 3577 | 4055 | 4424 | 4784 | 5153 | 5532 | 5929 | 6462 | 6838 |
| 1193 | 1831 | 2299 | 2745 | 3291 | 3605 | 4064 | 4429 | 4789 | 5154 | 5544 | 5932 | 6486 | 6840 |
| 1196 | 1841 | 2302 | 2763 | 3297 | 3608 | 4065 | 4435 | 4813 | 5157 | 5545 | 5953 | 6518 | 6856 |
| 1214 | 1861 | 2314 | 2781 | 3300 | 3612 | 4084 | 4437 | 4827 | 5161 | 5552 | 5968 | 6529 | 6863 |
| 1251 | 1897 | 2316 | 2792 | 3316 | 3616 | 4088 | 4444 | 4835 | 5166 | 5558 | 5988 | 6546 | 6868 |
| 1272 | 1918 | 2321 | 2794 | 3320 | 3628 | 4094 | 4449 | 4841 | 5172 | 5582 | 5992 | 6550 | 6872 |
| 1309 | 1949 | 2325 | 2796 | 3322 | 3647 | 4095 | 4454 | 4842 | 5174 | 5585 | 5995 | 6570 | 6906 |
| 1326 | 1969 | 2328 | 2800 | 3323 | 3686 | 4099 | 4455 | 4875 | 5177 | 5587 | 6005 | 6577 | 6909 |
| 1342 | 1972 | 2349 | 2807 | 3325 | 3692 | 4126 | 4473 | 4894 | 5178 | 5588 | 6041 | 6593 | 6963 |
| 1350 | 1986 | 2359 | 2841 | 3331 | 3698 | 4131 | 4474 | 4939 | 5211 | 5604 | 6044 | 6600 | 6964 |
| 1362 | 1991 | 2360 | 2908 | 3333 | 3700 | 4144 | 4479 | 4949 | 5223 | 5635 | 6045 | 6618 | 6965 |
| 1367 | 1997 | 2362 | 2982 | 3334 | 3708 | 4171 | 4486 | 4960 | 5240 | 5655 | 6056 | 6624 | 6966 |
| 1396 | 1998 | 2389 | 2994 | 3336 | 3744 | 4176 | 4487 | 4968 | 5252 | 5702 | 6060 | 6627 | 6968 |
| 1461 | 2000 | 2396 | 3029 | 3339 | 3764 | 4186 | 4520 | 4977 | 5259 | 5741 | 6066 | 6628 | 6979 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी विजयी विकली लॉटरी — सोडत संध्या. 5:00

सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 47 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 20/11/2024

पहिले बक्षिस रु. 10000/- — **MG-01 : 1548** — श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **2665** — रॉयल एजन्सी - आंकली

तिसरे बक्षिस रु. 1000/- — **2336** (त्रिमूर्ती लॉटरी एजन्सी, मुंबई) | **6071** (ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे) | 6963 | 7024 | 8085

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1596 | 2933 | 3631 | 4424 | 5518 | 6474 | 7410 | 8108 |
| 1010 | 1598 | 2974 | 3793 | 4444 | 5715 | 6616 | 7446 | 8499 |
| 1058 | 1961 | 3303 | 3836 | 4612 | 5785 | 6669 | 7544 | 8602 |
| 1144 | 2071 | 3367 | 3969 | 4833 | 5970 | 6872 | 7712 | 8692 |
| 1151 | 2199 | 3377 | 4108 | 4902 | 6006 | 7072 | 7759 | 8709 |
| 1178 | 2236 | 3386 | 4178 | 4946 | 6167 | 7137 | 7786 | 8740 |
| 1362 | 2281 | 3414 | 4264 | 5269 | 6173 | 7257 | 7807 | 8895 |
| 1483 | 2589 | 3490 | 4387 | 5295 | 6363 | 7295 | 7859 | 8931 |
| 1569 | 2803 | 3509 | 4423 | 5502 | 6460 | 7309 | 8068 | 8960 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गौरव मंथली लॉटरी

Draw No.81st Dt: 20-11-2024 4.00 pm Ticket Rs.50/-

1st Prize Rs. 35 लाख — जिंकले **G13-5771** जिंकले — स्टॉ: श्री गणेश एन्टरप्रायझेस, मुंबई

| Prize | Numbers |
|---|---|
| 2nd Prize Rs. 10,000/- | G06-2534, G28-2353, G38-4914, G54-3915, G55-3023 |
| 3rd Prize Rs. 5,000/- | 4029 |
| 4th Prize Rs. 3,000/- | 3511 |
| 5th Prize Rs. 2,000/- | 2129 |
| 6th Prize Rs. 1,000/- | 5523 |

7th Prize Rs. 500/- Common to all Series

1079 1208 1688 2265 3075 3440 3571 3737 5111 5328

8th Prize Rs. 100/- Common to all Series

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1005 | 1456 | 1988 | 2376 | 2865 | 3292 | 3745 | 4400 | 4840 | 5425 |
| 1008 | 1491 | 2012 | 2390 | 2882 | 3295 | 3766 | 4402 | 4861 | 5455 |
| 1013 | 1499 | 2023 | 2395 | 2888 | 3299 | 3769 | 4411 | 4867 | 5458 |
| 1014 | 1503 | 2024 | 2402 | 2899 | 3310 | 3793 | 4430 | 4870 | 5478 |
| 1016 | 1517 | 2040 | 2424 | 2914 | 3314 | 3835 | 4456 | 4939 | 5484 |
| 1019 | 1541 | 2062 | 2443 | 2922 | 3315 | 3839 | 4461 | 4948 | 5489 |
| 1034 | 1550 | 2067 | 2456 | 2923 | 3319 | 3851 | 4462 | 4964 | 5501 |
| 1078 | 1564 | 2073 | 2470 | 2926 | 3328 | 3863 | 4464 | 4974 | 5516 |
| 1084 | 1568 | 2112 | 2478 | 2930 | 3332 | 3868 | 4466 | 4977 | 5541 |
| 1091 | 1572 | 2123 | 2494 | 2935 | 3339 | 3873 | 4470 | 4984 | 5545 |
| 1105 | 1588 | 2162 | 2499 | 2962 | 3340 | 3878 | 4471 | 4991 | 5549 |
| 1111 | 1591 | 2182 | 2520 | 2969 | 3341 | 3883 | 4480 | 5007 | 5553 |
| 1114 | 1601 | 2185 | 2526 | 2978 | 3359 | 3899 | 4484 | 5011 | 5557 |
| 1117 | 1620 | 2192 | 2539 | 2980 | 3365 | 3926 | 4491 | 5012 | 5570 |
| 1130 | 1636 | 2202 | 2549 | 2986 | 3367 | 3933 | 4499 | 5041 | 5575 |
| 1141 | 1658 | 2210 | 2564 | 2988 | 3378 | 3942 | 4526 | 5050 | 5585 |
| 1145 | 1661 | 2216 | 2595 | 3002 | 3380 | 3945 | 4540 | 5054 | 5589 |
| 1153 | 1671 | 2217 | 2601 | 3007 | 3383 | 3968 | 4541 | 5055 | 5597 |
| 1154 | 1689 | 2218 | 2603 | 3036 | 3392 | 3971 | 4544 | 5057 | 5651 |
| 1161 | 1690 | 2220 | 2623 | 3038 | 3393 | 3974 | 4554 | 5059 | 5654 |
| 1177 | 1712 | 2223 | 2625 | 3043 | 3396 | 3983 | 4569 | 5073 | 5655 |
| 1180 | 1719 | 2228 | 2632 | 3047 | 3405 | 3998 | 4574 | 5087 | 5658 |
| 1182 | 1759 | 2233 | 2640 | 3052 | 3411 | 4004 | 4581 | 5090 | 5698 |
| 1188 | 1761 | 2235 | 2645 | 3085 | 3412 | 4012 | 4594 | 5102 | 5717 |
| 1189 | 1772 | 2249 | 2663 | 3099 | 3462 | 4046 | 4604 | 5135 | 5719 |
| 1191 | 1781 | 2252 | 2687 | 3104 | 3469 | 4047 | 4624 | 5159 | 5734 |
| 1194 | 1789 | 2254 | 2702 | 3109 | 3478 | 4063 | 4625 | 5179 | 5751 |
| 1206 | 1810 | 2258 | 2710 | 3146 | 3489 | 4083 | 4644 | 5195 | 5759 |
| 1217 | 1813 | 2260 | 2720 | 3173 | 3516 | 4116 | 4646 | 5199 | 5797 |
| 1226 | 1846 | 2262 | 2723 | 3186 | 3533 | 4144 | 4647 | 5220 | 5798 |
| 1253 | 1857 | 2264 | 2729 | 3187 | 3534 | 4163 | 4649 | 5222 | 5805 |
| 1258 | 1865 | 2268 | 2751 | 3190 | 3546 | 4164 | 4674 | 5224 | 5815 |
| 1307 | 1871 | 2270 | 2796 | 3191 | 3608 | 4167 | 4679 | 5235 | 5845 |
| 1326 | 1880 | 2273 | 2802 | 3217 | 3609 | 4176 | 4704 | 5243 | 5852 |
| 1347 | 1884 | 2276 | 2813 | 3228 | 3631 | 4177 | 4712 | 5260 | 5854 |
| 1351 | 1890 | 2281 | 2821 | 3234 | 3632 | 4234 | 4726 | 5263 | 5855 |
| 1371 | 1914 | 2282 | 2823 | 3236 | 3635 | 4236 | 4741 | 5286 | 5856 |
| 1377 | 1919 | 2283 | 2825 | 3243 | 3668 | 4242 | 4749 | 5294 | 5891 |
| 1386 | 1928 | 2284 | 2827 | 3246 | 3675 | 4247 | 4765 | 5306 | 5921 |
| 1395 | 1938 | 2299 | 2832 | 3248 | 3697 | 4262 | 4778 | 5315 | 5951 |
| 1402 | 1950 | 2300 | 2833 | 3267 | 3706 | 4291 | 4782 | 5335 | 5955 |
| 1413 | 1961 | 2321 | 2845 | 3271 | 3724 | 4315 | 4784 | 5368 | 5956 |
| 1418 | 1971 | 2348 | 2852 | 3273 | 3730 | 4320 | 4793 | 5383 | 5967 |
| 1423 | 1976 | 2360 | 2853 | 3280 | 3735 | 4341 | 4828 | 5405 | 5968 |
| 1440 | 1987 | 2374 | 2862 | 3284 | 3736 | 4366 | 4837 | 5407 | 5973 |

Check result with Official Gazette. Issued by : Director, Maharashtra State Lottery

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# जीवघेण्या प्रवासाचे वाढते धोके

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत देशभरातून लोक येत असतात. यामध्ये नोकरी, व्यवसाय, रोजगारासाठी आणि गावाकडे पोट भरणे शक्य होत नाही म्हणून या महानगरात पोटाची खळगी भरण्यासाठी येणाऱ्यांची संख्याही सर्वाधिक आहे. ज्या मुंबईला स्वप्ननगरी, कुबेरनगरी म्हटले जाते तिथे दरिद्री नारायणांची संख्या म्हणजेच गरीबांची संख्या तितकीच मोठी आहे हे विसरून चालणार नाही. ज्या ज्यावेळी मुंबईच्या आधुनिकतेचा किंवा श्रीमंतीचा गौरव होत असतो त्या त्यावेळी आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी धारावीच्या रूपाने याच मुंबईत असल्याचे सांगितले जात होते. जीवाची मुंबई करणाऱ्यांची संख्या जरी थोडी असली तरी अलिकडच्या काळात मुंबईतली वाढती गर्दी लोकसंख्येच्या तुलनेत साधनसुविधांचा अभाव आणि रोज जगण्याचीच जोखीम स्वीकारून करावा लागणारा प्रवास हीदेखील याच मुंबईची लक्षणे आहेत. जिथे रोजच्याच जगण्यासाठी अनेकांना आटापिटा करावा लागतो. त्यांच्यासाठी जीवाची मुंबई नव्हे तर त्यांना जगण्यासाठी मुंबई हवी असते आणि हा असाच आटापिटा करता करता अशाच लोकांवर याच मुंबईत जीव गमावण्याचीही वेळ येते. मुंबईतला कोणत्याही प्रकारचा प्रवास हा सुखकर राहिलेला नाही. तो वेळ,शक्ती, पैसा खर्च करणारा आणि अनेकांच्याबाबतीत खरोखर जीव घेणारा ठरला आहे. गेल्या अनेक दशकांपासून मुंबईची उपनगरीय रेल्वे सेवा ही कशी जीवघेणी ठरते. याचे आकडेदेखील दरवर्षी प्रसिद्ध होत असतात. मग लोकलमधून खाली पडल्याने रुळाशेजारच्या खांबाला धडक बसल्याने घाईघाईत रूळ ओलांडताना त्याच घाईत लोकल पकडताना मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या अजूनही अपेक्षेप्रमाणे कमी झालेली नाही. अगदी दहा वर्षापूर्वी दरवर्षी मुंबईच्या या उपनगरीय प्रवाशांच्या बळींची संख्या दरवर्षी दहा हजाराच्या घरात होती. ती आता चार हजारापर्यंत खाली आलेली आहे. परंतु दरवर्षी चार हजार मुंबईकरांचे अशा पद्धतीने बळी जावे हे अत्यंत चिंताजनक ठरते. म्हणजे सरासरी रोज सहा ते सात प्रवासी या जीवघेण्या प्रवासाचे बळी ठरतात.

**वाढणारी प्रवाशांची गर्दी**

अलिकडेच मध्य रेल्वेने या बळींची आकडेवारी सांगताना मोठाच धक्का दिला. गेल्या दहा महिन्यात मध्य रेल्वेवर तब्बल २३८८ जणांना जीव गमवावा लागला. म्हणजे सरासरी रोज सात जण या अपघातामध्ये मृत्युमुखी पडत होते. यातले जवळपास १हजार २१० प्रवाशांचा रेल्वे रूळ ओलांडताना मृत्यू झाल्याचे समोर आले आहे आणि ६५३ प्रवासी हे धावत्या रेल्वेतून पडल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. २०२३ मध्ये जानेवारी ते ऑक्टोबर दरम्यान मध्य रेल्वेवर ३ हजार ५९९ अपघात झाले होते. तर यावर्षी ही संख्या वाढून ४ हजार १०७ झाली आहे. अनेक प्रकारच्या उपाययोजना करूनही अपघातांची संख्या वाढत असेल तर त्याची तातडीने दखल घेणे गरजेचे ठरते. कारण मध्य रेल्वेच्या म्हणण्याप्रमाणे रेल्वेकडून ज्या ज्या उपाययोजना केल्या गेल्या ज्यामध्ये शून्य अपघात मोहीमही राबवली जाते. शिवाय अनेक ठिकाणी पुलांची उभारणी, सरकते जिने, लिफ्ट, फलाटांची उंची वाढवणे यासारखी कामेदेखील होत आहेत. तरीदेखील अपघातांची संख्या वाढते. म्हणजेच केल्या जात असलेल्या सुविधा आणि प्रवाशांची वाढती संख्या यामध्ये अजूनही मोठी तफावत असल्याचे म्हणावे लागते.ही गोष्टदेखील तितकीच खरी आहे की अनेक प्रवाशांना लोकल पकडण्याची प्रचंड घाई असते. कधीतरी घरातून निघायला उशीर झालेला असतो आणि आपली नेहमीची लोकल पकडण्याकरीता अनेक प्रवासी पुलांचा वापर न करता रेल्वे रूळ ओलांडण्याची आणि धावती लोकल पकडण्याची जोखीम स्वीकारतात. त्याचे हे तितकेच मोठे दुष्परिणाम आहेत हे नाकरता येणार नाही. परंतु यातली धोकादायक वस्तुस्थिती हीच आहे की ज्याप्रमाणात प्रवाशांची संख्या वाढते आहे त्याप्रमाणात मुंबईतल्या उपनगरीय रेल्वेच्या साधनसुविधांवरही मर्यादा येत आहेत. जागेचा अभाव आणि दर तीन चार मिनिटाला एक लोकल सोडूनही सकाळ संध्याकाळच्यावेळात होणारी गर्दी यावर आणखी काही उपाय शोधण्याचीदेखील तितकीच गरज वाटू लागते.

**अन्य उपायांची आवश्यकता**

गर्दीला रोखणे अशक्य आहे. परंतु प्रवासाच्या सोयीसुविधांची निर्मिती करीत राहाणेहेदेखील काळानुसार आवश्यक ठरते. म्हणूनच उपनगरीय रेल्वेवरचा हा ताण कमी करण्याकरीता मेट्रो रेल्वेचा मोठा हातभार लागू शकतो. जिच्यामुळे अपघातांची संख्याही खूप कमी होते. विशेषतः रूळ ओलांडण्याचा किंवा धावती मेट्रो पकडण्याचा प्रश्नच तिथे उद्भवत नाही. अर्थात असे असले तरी सकाळ आणि संध्याकाळच्या वेळात लोकलसाठी होणारी गर्दी खूप कमी होईल असेदेखील म्हणता येत नाही. पुढच्या पंचवीस तीस वर्षाचा विचार करून मुंबईच्या या उपनगरीय रेल्वेचे आधुनिकीकरण करणे आवश्यक ठरते. विशेषतः जागेची मर्यादा असल्याने अधिक रेल्वे लाईन्स टाकणे आता शक्य होण्यासारखे नाही. म्हणूनच आहे त्या जागांवर उड्डाणपूल बांधून समांतर रेल्वे सेवा चालवणे किंवा पुढे अधिक संशोधन आणि विचार करून दुमजली लोकलचा प्रयोग करणे अनाठायी ठरणार नाही. यापूर्वी दुमजली रेल्वेचा प्रवास यशस्वी ठरलेला आहे. त्यात थोड्या सुधारणा करून दुमजली लोकल हा विषयसुद्धा करता येऊ शकतो. याबरोबरच ज्या सकाळ आणि संध्याकाळच्यावेळात मुंबईच्या उत्तर आणि दक्षिण दिशेला जाणाऱ्यांची गर्दी असते. ती कमी करण्यासाठी त्या भागातल्या कार्यालयांच्या वेळांमध्ये बदल करता येऊ शकतो. आज सरसकट दक्षिण मुंबईत ऑफिसला येणाऱ्यांच्या वेळा यासाधारण आठ ते अकरापर्यंतच्या असतात. त्यामध्ये जर एक एकतासाने फरक केला म्हणजे अगदी दुपारी एक किंवा दोनपर्यंत काही कार्यालयांच्या वेळा ठेवल्या गेल्या. तरीसुद्धा सकाळच्यावेळात होणारी गर्दी कमी होईल आणि अनाठायी जाणारे बळीही रोखता येतील.

**सुविचार**

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**माणसाचं मन निर्मळ असले की,
त्याला पुण्य कमवायची आणि चरित्र गमवायची भीती उरत नाही.**

**पंचांग**

**गुरुवार, २१ नोव्हेंबर, २०२४**
**शक १९४६ क्रोधीनामसंवत्सर**



**कार्तिक कृष्ण षष्ठी**
**नक्षत्र : पुष्य**

**रवी उदय- ०६-५१**
**रवी अस्त- १७-५८**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० कर्क**

**गुरुपुष्यामृत सूर्योदयापासून दुपारी ३.३४ पर्यंत, धनुरयन उ. रात्री १.२६, श्रीदादा म. पुण्यतिथी पाटगाव, महाराष्ट्र राज्य हुतात्मा दिन**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### काजू मसाला करी

★ **साहित्य** - १ मोठा कांदा, १/३ कप काजू ग्रेव्हीसाठी, १/३ कप काजू मसाला पेस्ट, १ छोटा कांदा बारीक चिरलेला, २ टोमॅटो चिरलेले, आले, लसूण आणि हिरवी मिरचीची पेस्ट, कोथिंबीर, दालचिनी, तमालपत्र, कसुरी मेथी, लाल तिखट, हळद, धणे पावडर, गरम मसाला, जिरे, १ चमचा देसी तूप, तेल, मीठ चवीनुसार, १/३ कप पाणी

★ **कृती** - सर्वप्रथम काजू आणि कांद्याचे तुकडे उकळून घ्या. उकळल्यानंतर या दोन्ही गोष्टी पाण्यातून बाहेर काढा आणि धुवा. जेणेकरून ग्रेव्हीचा रंग पांढरा होईल. आता ग्राईंडरमध्ये कांदा आणि काजूची बारीक पेस्ट तयार करा. आता एका पॅन किंवा कढईत तूप गरम करा. यात काजू टाकून तळून घ्या आणि सोनेरी झाल्यावर बाहेर काढा. आता उरलेल्या देशी तुपात तेल घालून गरम करा. त्यात जिरे, तमालपत्र आणि दालचिनी घाला. आता आले, लसूण पेस्ट घालून हलके परतून घ्या. नंतर त्यात बारीक चिरलेला कांदा टाकून चांगला परता. कांदा चांगला भाजल्यानंतर लाल होऊ लागला की त्यात हळद, तिखट आणि धने पावडर, जिरे पूड टाकून भाजून घ्या. हे सर्व नीट मिक्स करा आणि ३० सेकंद भाजून घ्या. आता त्यात थोडे पाणी टाकून मिक्स करा. आता बारीक चिरलेला टोमॅटो आणि मीठ घाला. झाकण ठेवून दोन ते पाच मिनिटे शिजवा. टोमॅटो चांगला शिजला आणि वितळला की झाकण काढून त्यात काजू आणि कांद्याची पेस्ट घाला. हे सर्व नीट मिक्स करून शिजू द्या. आता गरम मसाला आणि कसुरी मेथी घाला. नंतर तळलेले काजू घालून कोथिंबीरने गार्निश करा. तुमची काजू मसाला करी सर्व्ह करण्यासाठी तयार आहे.



# चायना मास्टर्स बॅडमिंटन ! भारताची चांगली सुरुवात
# पी.व्ही. सिंधू , लक्ष्य सेन, मालविकाची विजयी सलामी

**सध्या चीनच्या शेनजेन मध्ये सुरु असलेल्या चायना मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी चांगली सुरुवात केली पुरुष एकेरीत लक्ष्य सेनने तर महिला एकेरीत पी. व्ही. सिंधू व मालविकाने विजयी सलामी देत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला . त्यामुळे या तिन्ही खेळाडूंकडून खास करून सिंधू आणि लक्ष्य सेनकडून पदकाच्या अपेक्षा आहेत. विशेष म्हणजे महिला एकेरीत सिंधूने प्रतिस्पर्धी बुसानन हिला विसाव्या वेळी पराभूत केले. तर लीजी जीयाचा पराभव करून लक्ष्य सेनने ऑलिम्पिक मध्ये झालेल्या पराभवाची परतफेड केली.**



■ शेनजेन

पहिल्या फेरीत पुरुष एकेरीत लक्ष्य सेन विरुद्ध ली जी जिया यांच्यातील लढत लक्षणीय ठरली. कारण जीयाने लक्ष्य सेनला ऑलिम्पिक मध्ये कांस्य पदकाच्या लढतीत हरवले होते. त्यामुळे त्या पराभवाचा वचपा काढण्यासाठी लक्ष्य सेन त्वेषाने लढला आणि ५७ मिनिटाच्या संघर्षपूर्ण लढतीत त्याने ली जी जीयाचा २१-१४ १३-२१,२१-१३ अशा गुणांनी पराभव करून दुसरी फेरी गाठली . तर महिला एकेरीत भारताची बॅडमिंटनक्वीन पी. व्ही. सिंधू समोर थायलंडची बुसानन होती जिला सिंधूने १९ वेळा पराभूत केले होते. पण यावेळी मात्र तिने सिंधूला बऱ्यापैकी लढत दिली.पण सिंधूने पण सिंधूने तिला ५० मिनिटांच्या लढतीत २१-१७,२१-१९ अशा सरळ सेटमध्ये पराभूत केले. बुसानवर तिचा हा २० वा विजय आहे. या विजयासह सिंधूने महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. महिला एकेरीच्या आणखी एका सामन्यात मात्र भारताच्या मालविकाने मोठा उलटफेर करीत डेन्मार्कच्या लीने होजमार्क जाएस्प्रेट हिला २०-२२,२३-२१,२१-१६ अशा गुणांनी पराभूत करून या स्पर्धेत मोठा उलटफेर केला आहे. कारण महिला टेनिस मध्ये लीने होजमार्क ची रँकिंग २१ आहे तर मालविकाची ३६ असे असताना मालाविकाने लीनेला जबरदस्त लढत देऊन पराभूत केले. त्यामुळे मालविकाकडूनही मोठ्या अपेक्षा आहेत. दरम्यान सामना संपल्यानंतर लक्ष्य सेनने सांगितले. पहिल्या फेरीप्रमाणेच पुढील सामन्यातही मी चांगला खेळ करीन.


## टेनिस स्टार राफेल नदालच्या कारकिर्दीचा पराभवाने शेवट

■ मलागा



तब्बल २२ ग्रँडस्लॅम जिंकणाऱ्या राफेल नदालने टेनिसमधून निवृत्ती घेतली आहे. मंगळवारी मलागा येथील त्याच्या घरच्या मैदानावर त्याने शेवटचा डेव्हिस कप सामना खेळला, तथापि तो हरला. त्याला नेदरलँडसच्या ८० व्या मानांकित बोटिक व्हॅन डी झिडशल्पने ६-४, ६-४ ने पराभूत केले. सलग २९ सामने जिंकून नदालला डेव्हिस कपमध्ये पराभव पत्करावा लागला आहे. मार्टिन कार्पेना अरेना येथे एका भावनिक व्हिडिओमध्ये ३८ वर्षीय दिग्गजाला निरोप देण्यात आला. तो म्हणाला-मी मानसिक शांततेने टेनिस सोडत आहे. मला आनंद आहे की मी एक वारसा सोडला आहे, जो केवळ खेळाचा नाही तर वैयक्तिक वारसा आहे. मला वाटतं मला जे प्रेम मिळाले आहे तेच जर कोर्टवर झालं असतं तर हे झालं नसतं.पुरुष एकेरीत सर्वाधिक ग्रँडस्लॅम जिंकणारा नदाल हा दुसरा खेळाडू आहे. नदालने २२ विजेतेपद पटकावले आहेत.

## फुटबॉलस्टार मेस्सी पुढील वर्षी भारतात येणार



■ कोची

स्टार फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी पुढील वर्षी एका आंतरराष्ट्रीय सामन्यासाठी भारतात येणार आहे. त्याचा राष्ट्रीय संघ अर्जेंटिना केरळमध्ये येणार आहे. हा सामना जून किंवा जुलैमध्ये खेळवला जाईल. मात्र हा सामना कोणत्या संघाविरुद्ध खेळवला जाईल हे सांगण्यात आलेले नाही. यापूर्वी मेस्सी २०११ मध्ये आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण सामन्यासाठी भारतात आला होता. त्यानंतर आता पुन्हा एकदा मेस्सी भारतात येणार आहे. असे केरळचे क्रीडा मंत्री व्ही. अब्दुल रहेमान यांनी बुधवारी सांगितले. अब्दुल रहेमान पुढे म्हणाले की, हा सामना राज्य सरकारच्या देखरेखीखाली होणार आहे. या सामन्यासाठी राज्य सरकार आवश्यकती ती सर्व तयारी करीत आहे. भारतात मेस्सीचा फार मोठा चाहता वर्ग आहे. त्यामुळे मेस्सीला पाहण्यासाठी त्याचे चाहते उत्सुक आहेत.

## पाकिस्तानला भारताचा आणखी एक धक्का अंध टी-२० क्रिकेट विश्वचषकातून माघार

■ नवी दिल्ली

भारत सरकारने पाकिस्तानला आणखी एक धक्का दिला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने भारतीय संघाला अंध टी-२० विश्वचषकासाठी पाकिस्तानात जाण्याची परवानगी दिलेली नाही. अशा परिस्थितीत अंध भारतीय क्रिकेट संघाने विश्वचषकातून माघार घेतली आहे. क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड इन इंडियाचे सहाय्यक सचिव शेलेंद्र यादव यांनी ही माहिती दिली. अंध टी-२० क्रिकेट विश्वचषक २०२४ चे आयोजन पाकिस्तानमध्ये केले जाणार आहे. ही स्पर्धा २३ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर या कालावधीत खेळवली जाणार आहे. यासाठी क्रीडा



मंत्रालयाने भारतीय अंध संघाला पाकिस्तानात जाण्याची परवानगी दिली होती. मात्र येथेही हे प्रकरण शासनाच्या मान्यतेसाठी प्रलंबित होते. क्रीडा मंत्रालयाची परवानगी पुरेशी नव्हती. भारतीय संघाला पाकिस्तानात जाण्यासाठी गृह मंत्रालय आणि परराष्ट्र मंत्रालयाचीही परवानगी आवश्यक होती. या दोनही मंत्रालयाने त्यांना अंध संघाला पाकिस्तानात पाठवण्याची परवानगी दिलेली नाही.

## पंड्या बंधू एकत्र खेळणार

■ बडोदा

मुश्ताक अली चषक स्पर्धेसाठी हार्दिक पंड्याचे बडोदा संघात पुनरागमन झाले आहे. तो कुणाल पंड्याच्या नेतृत्वाखाली खेळणार आहे. त्यामुळे बडोदा संघाची स्थिती बळकट झाली आहे.२३ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या बीसीसीआयच्या देशांतर्गत क्रिकेटच्या या प्रमुख टी-२० स्पर्धेत, बडोद्याला उत्तराखंड, तामिळनाडू, त्रिपुरा, कर्नाटक, सिक्कीम आणि दोन शेजारी सौराष्ट्र आणि गुजरातसह ब गटात ठेवण्यात आले आहे. बडोद्याचा पहिला सामना गुजरात विरुद्ध होळकर स्टेडियम, इंदूर येथे होणार आहे. हार्दिक पंड्या संपूर्ण स्पर्धेसाठी उपलब्ध असण्याची अपेक्षा आहे.

## आयसीसीच्या जागतिक क्रमवारीत हार्दिक पंड्या अव्वल

■ लंडन

हार्दिक पंड्या आयसीसीच्या ताज्या जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकाचा अष्टपैलू खेळाडू बनला आहे. त्याने इंग्लंडच्या लियाम लिव्हिंगस्टनला मागे टाकले आहे. त्याचबरोबर दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० मालिकेत सलग दोन शतके झळकावणाऱ्या तिलक वर्माने फलंदाजांच्या क्रमवारीत ६९ स्थानांची मोठी झेप घेतली आहे. आता तो तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. ऑफ स्पिनर वरुण चक्रवर्तीला ६ स्थानांचा आणि सलामीवीर संजू सॅमसनला १७ स्थानांचा फायदा झाला आहे. वरुण गोलंदाजी क्रमवारीत २८ व्या तर संजू फलंदाजीच्या क्रमवारीत २२व्या स्थानावर पोहोचला आहे. तिलक वर्मा, सूर्यकुमार यादव आणि यशस्वी जैस्वाल हे ३ भारतीय टी-२० फलंदाजांच्या क्रमवारीत टॉप-१० मध्ये आहेत.

## प्रो कबड्डी लीग ! यु मुंबा - युपी योद्धा सामना बरोबरीत

■ नोएडा



प्रो कबड्डी लीगमध्ये युपी योद्धा विरुद्ध यु मुंबा यांच्यातील सामना २९-२९ असा बरोबरीत सुटला पण याचा फायदा यु मुंबाला झाला . कारण गुणतालिकेत मागे पडलेल्या यु मुंबाने पुन्हा दुसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे. यु मुंबा - युपी योद्धा यांच्यातील सामन्याची सुरुवातीपासून थरारक सुरुवात झाली. युपी योद्धाच्या भवानी राजपूतने १० तर यु मुंबाच्या पंकज मोहितेने ९ गुण घेतला. पहिल्या हाप मध्ये १६-१४ अशी गुणसंख्या होती. तर सामना संपायला १० मिनिटे शिल्लक असताना २०-२० अशी बरोबरी झाली होती . त्यामुळे कोण जिंकणार याबाबत प्रचंड उत्सुकता होती . पण दोन्ही संघ आक्रमक खेळ करीत असल्याने कोणालाच निर्णायक आघाडी मिळाली नाही आणि अखेर हा सामना २९- २९ असा बरोबरीत सुटला.

## मनु भाकर, नीरज, हरमनप्रीत, स्मृती क्रीडा पुरस्काराने सन्मानित

■ नवी दिल्ली

वेगवेगळ्या क्रीडा क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या भारतीय खेळाडूंना भारतीय क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. कॉर्नरस्पोर्ट्सच्या संकल्पनेतून साकारण्यात आलेल्या या सन्मान सोहळ्यात ऑलिम्पिक स्पर्धेत लक्षवेधी कामगिरी करणारी मनू भाकर, सलग दुसऱ्यांदा ऑलिम्पिक स्पर्धा गाजवणारा नीरज चोप्रा, हॉकी संघाचा कॅप्टन हरमनप्रीत सिंग आणि क्रिकेट जगतातील लोकप्रिय चेहरा असणारी स्मृती मंधाना आणि युवा भारतीय बॅटर यशस्वी जैस्वाल या मंडळींचा यात समावेश आहे.



परीस येथे पार पडलेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत पदकी निशाणा साधणारी भारताची नेमबाज मनू भाकर हिला वैयक्तिक क्रीडा प्रकारातील सर्वोत्कृष्ट महिला खेळाडू ठरली. मनू भाकर हिने जगातील मानाच्या स्पर्धेत १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात वैयक्तिक आणि सांघिक कांस्यपदक अशी दोन पदके पटकावली होती. याआधी २०१९ मध्ये या पुरस्कार सोहळ्यात तिला उदयोन्मुख महिला खेळाडूच्या रुपात सन्मानित करण्यात आले होते. भारताचा गोल्डन बॉय भालाफेकपटू नीरज चोप्राला वैयक्तिक क्रीडा खेळासाठी वर्षातील सर्वोत्कृष्ट खेळाडूच्या रुपात सन्मानित करण्यात आले. २०२० मध्ये टोकियो ऑलिम्पिक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणाऱ्या नीरज चोप्रानं पॅरिस ऑलिम्पिकमध्ये रौप्य पदक पटकावले होते.

# आली मुहूर्तघटिका...

**अमेरिकेतील फेडरल रिझर्व्ह या केंद्रीय मध्यवर्ती बँकेच्या बैठकीकडे सध्या जगभरातील शेअर बाजारांचे, निर्देशांकांचे, गुंतवणूकदारांचे, ब्रोकर्सचे लक्ष लागून राहिले आहे. विवाहाचा मुहूर्त जसजसा जवळ येतो तसतशी वधुवरांची घालमेल ज्याप्रमाणे सुरू होते तशीच स्थिती सध्या गुंतवणूकदारांची झाली आहे. याचे कारण यासंदर्भात विविध विश्लेषकांकडून मांडली जाणारी वेगवेगळी मते. बहुतांश विश्लेषकांनी फेडरल रिझर्व्हकडून पाव ते अर्ध्या टयांची दरकपात केली जाईल अशी शयता वर्तवली आहे.**

अमेरिकेतील फेडरल रिझर्व्ह या केंद्रीय मध्यवर्ती बँकेच्या बैठकीकडे सध्या जगभरातील शेअर बाजारांचे, निर्देशांकांचे, गुंतवणूकदारांचे, ब्रोकर्सचे लक्ष लागून राहिले आहे. विवाहाचा मुहूर्त जसजसा जवळ येतो तसतशी वधुवरांची घालमेल ज्याप्रमाणे सुरू होते तशीच स्थिती सध्या गुंतवणूकदारांची झाली आहे. याचे कारण यासंदर्भात विविध विश्लेषकांकडून मांडली जाणारी वेगवेगळी मते. बहुतांश विश्लेषकांनी फेडरल रिझर्व्हकडून पाव ते अर्ध्या टक्क्यांची दरकपात केली जाईल अशी शयता वर्तवली आहे. तसे झाल्यास भारतासारख्या उभरत्या अर्थव्यवस्थांसाठी ती सुवार्ता असेल. कारण यामुळे डॉलर काहीसा कमजोर होऊन विदेशातून येणारा पैशांचा ओघ वाढेल असे मानणारा एक वर्ग आहे. असेही मुख्य व्याजदरातील कपात ही शेअर बाजारासाठी चांगली बातमी असते.



कारण यामुळे गुंतवणूकदारांना स्वस्तात भांडवल उपलब्ध होते आणि ते बाजारात गुंतवून नफा कमावण्याची संधी मिळते. मात्र यावेळी मुद्दा केवळ दरकपातीचा नसून ती किती होणार हा मोठा मुद्दा असून त्याचा परिणाम बाजारावर होणार आहे. जर अमेरिकन फेडने व्याजदरात मोठी कपात केली तर शेअर बाजारात नकारात्मक पडसाद उमटू शकतात. बहुतेक तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की फेड व्याजदरात २५ बेसिस पॉइंट्स म्हणजेच ०.२५ टयांची कपात करेल. तथापि, काहींचा असा विश्वास आहे की ती अर्धा टक्के असेल. व्याजदरातील मोठी कपात अमेरिकन अर्थव्यवस्थेची चिंताजनक स्थिती दर्शवणारी मानली जाऊ शकते. त्यावर बाजारातून नकारात्मक प्रतिक्रिया दिसू शकतात.

या सर्व शयतांदरम्यान भारतीय शेअर बाजाराने गेल्या आठवड्यात जोरदार मुसंडी मारत सर्व नकारात्मक, मंदीच्या शयतांना पायदळी तुडवत नवा उच्चांक गाठला. फेड रिझर्व्हच्या आगामी बैठकीबरोबरच



देशांतर्गत दमदार मान्सून, नियंत्रणात असलेली महागाई यांचाही सकारात्मक परिणाम बाजारावर दिसून आला. गेल्या आठवड्यात बीएसई सेन्सेसने २.१०

Mahamoney.com

टक्क्यांची म्हणजेच १७०७ अंकांची उसळी घेत ८२८९०.९४ वर विसावा घेतला आहे; तर निफ्टी ५० निर्देशाकांत ५०४.३५ अंकांची वाढ होऊन तो २५३५६.५० अंकांवर बंद झाला आहे. गतसप्ताहात स्मॉलकॅप निर्देशांकात, लार्जकॅपमध्ये २-२ टक्क्यांची वाढ झाली, तर मिडकॅपमध्ये १.५ टयांची वाढ झाली. १२ सप्टेंबर रोजी निफ्टीने २५४३३.३५ आणि सेन्सेसने ८३११६.१९ हा नवा उच्चांक गाठला होता. निफ्टी एफएमसीजी, निफ्टी आयटी, निफ्टी मीडिया निर्देशांकात ३ टक्क्यांची वाढ दिसून आली.

या तेजीला मूळ आधार ठरला तो विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून झालेली खरेदी. एफआयआयनी गतसप्ताहात १५१९९.६ कोटींच्या समभागांची खरेदी केली आहे; तर डीआयआयनीही २४४४.१९ कोटींचे समभाग खरेदी केले आहेत. चालू महिन्यात आतापर्यंत एफआयआयनी १६६००.८८ कोटी रुपयांच्या समभागांची खरेदी केली आहे.

टेनिकल चार्ट पाहिल्यास निफ्टीमध्ये चढती भाजणी कायम राहण्याचे संकेत मिळत आहेत; पण बाजार सध्या ओव्हरबॉट स्थितीत गेला आहे. त्यामुळे फेडच्या निर्णयापर्यंत आणि नंतरही बाजारात जोरदार घुसळण दिसू शकते. निफ्टीसाठी २५२२५-२५००० या भक्कम आधार पातळी आहेत; तर २५५०० च्या वर निफ्टी स्थिरावल्यास तो २५७०० ते २६ हजारांपर्यंत झेपावू शकतो. २५हजारांखाली गेल्यास ट्रेंड बदलला असे म्हणता येईल. बँकनिफ्टीसाठी ५१३५० ही भकम आधार पातळी असून ५२२५० ते ५२७०० पर्यंत हा निर्देशांक झेपावूही शकतो.

यादरम्यान नुवामा'च्या एका अहवालाची सध्या सर्वत्र चर्चा आहे. त्यानुसार २००१ मध्ये, टेक बबल फुटल्यानंतर फेडच्या दर कपातीला नऊ महिने उशीर झाला होता. त्यामुळे जागतिक बाजारात डी-रेटिंग झाले आणि २००१ मध्ये निफ्टीत ३५ टक्क्यांची घसरण झाली होती. २०२० मध्ये निफ्टीत २० टके घसरण झाली होती. २००७-०८ च्या दर कपातीपूर्वी बाजारात चांगली तेजी राहिली; पण जागतिक संकटामुळे पुढे २००८ मध्ये बाजार ६० टक्क्यांनी घसरले होते. हे लक्षात घेऊन गुंतवणूकदारांनी आपली जोखीम कमीत कमी कशी करता येईल याकडे लक्ष द्यायला हवे. मध्यमकालीन-अल्पकालीन गुंतवणूकदारांनीही यापुढील उच्चांकावेळी नफावसुली करावी, असा सल्ला दिला जात आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे फेड रिझर्व्हच्या संभाव्य दरकपातीनंतर भारतात आरबीआयही पुढील महिन्यात रेपोदरात कपात करेल अशी चर्चा सुरू होती. पण गव्हर्नर शतिकांत दास यांनी अलीकडेच एका कार्यक्रमात बोलताना दरकपातीचे धोके विषद केले आहेत. त्यामुळे आरबीआय लागलीच फेडची री ओढण्याची शक्यता दिसत नाहीये. ही बाब गुंतवणूकदारांनी लक्षात ठेवावी. एकूणात पाहता, बाजार तेजीच्या मूडमध्ये असला, एफआयआयकडून खरेदी सुरू झाली असली आणि समोर फेड रिझर्व्हची संभाव्य दरकपात दिसत असली तरी बाजारातील जोखीमही तितकीच वाढलेली आहे. सबब अशा काळात वेट अँड वॉच भूमिका घ्यावी; अन्यथा सेल ऑन राईज ही भूमिका घ्यावी.

# नाशिकमध्ये राडा! सुहास कांदे यांची समीर भुजबळांना जीवे मारण्याची धमकी

**कार्यकर्त्यांना शांतता राखण्याचे आवाहन**

■ नाशिक

**नाशिक** जिल्ह्यातील नांदगाव विधानसभा मतदारसंघात अपक्ष उमेदवार समीर भुजबळ आणि शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार सुहास कांदे यांचे कार्यकर्ते आमने-सामने आले. या प्रसंगी समीर भुजबळ आणि कांदे यांच्यात जोरदार बाचाबाची झाली. त्यावेळी संतापलेल्या सुहास कांदे यांनी समीर भुजबळ यांना थेट जीवे मारण्याची धमकी दिली. तुझा मर्डर आज फिक्स आहे,अशा शब्दात कांदे यांनी समीर भुजबळ यांना धमकावले.

समीर भुजबळ आपल्या कार्यकर्त्यांसह नांदगाव-मनमाड रस्त्यावरून चालले असता वाटेतील गुरुकूल महाविद्यालयात मोठ्या संख्येने रस्त्याच्या कडेला ट्रक आणि बस उभ्या होत्या . हे पाहून त्यांनी चौकशी केली तेव्हा त्यांना कळले की काही हजार जण महाविद्यालयाच्या आवारात सुहास कांदे



यांनी आणले असून त्यांच्या खाण्यापिण्याची सोय केली आहे . त्यांनी लगेच पोलीस व आयोगाकडे तक्रार केली आणि महाविद्यालयातील लोकांना पुढे जाण्यापासून रोखून धरले . समीर भुजबळ आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी त्यांना रोखले असता सुहास कांदे आणि त्यांचे कार्यकर्ते समीर भुजबळ यांना भिडले. दोन्ही बाजूचे कार्यकर्ते एकमेकांवर हल्ला करण्याच्या तयारीत होते. मात्र तेवढ्यात तिथे पोलीस दाखल झाले. पोलिसांनी दोन्ही बाजुंच्या कार्यकर्त्यांना शांतता राखण्याचे आवाहन केले. पोलीस समजूत काढत असताना समीर भुजबळ यांनी सुहास कांदे यांनी पैसे वाटप करण्यासाठीच त्या लोकांना बोलावले आहे,असा आरोप केला. पोलिसांनी जमलेल्या लोकांची चौकशी केली असता ते सर्व ढेकू गावातील रहिवासी असल्याचे आढळले. त्यांच्यामध्ये कोणीही उत्तर प्रदेश किंवा बिहारचा रहिवासी आढळला नाही,असे पोलिसांनी सांगितले. हे सर्व मतदार होते , त्यांची खाण्याची सोय त्या ठिकाणी केली होती.

# धुळ्यात पैसे वाटपाचा आरोप भाजपा कार्यकर्त्याला मारहाण

■ धुळे

**धुळ्यामध्ये** संभाजीनगर भागातील मतदान केंद्रावर भाजपाकडून पैशांचे वाटप होत असल्याचा आरोप करीत पैसे वाटणाऱ्या भाजपाच्या कार्यकर्त्याला वंचितच्या कार्यकर्त्यांनी पकडून मारहाण केली. पोलिसांनी हस्तक्षेप करत तरुणाला ताब्यात घेतले. या प्रकरणानंतर मतदान केंद्राबाहेर काही काळ तणाव निर्माण झाला होता. मतदानाच्या दिवशीच मतदान केंद्रावर अशा पद्धतीने पैशांची वाटप केल्यामुळे खळबळ उडाली आहे. या प्रकरणाचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला आहे.

**पोलिसांनी हस्तक्षेप करत तरुणाला ताब्यात घेतले**

# वरळीमध्ये मनसे आणि शिंदे गटात राडा

■ मुंबई

**वरळी** विधानसभा मतदारसंघामध्ये शिंदे गट आणि मनसेमध्ये आज सकाळी राडा झाला. शिंदे गटाकडून राज ठाकरे यांच्या बनावट सहीचे पत्र व्हायरल झाले . या पत्रामध्ये राज ठाकरे यांच्या सहीसोबत मनसेने शिंदे गटाच्या उमेदवाराला पाठिंबा दिला आहे असे नमूद केले होते. त्यानंतर मनसेच्या कार्यकर्त्यांनी जाब विचारत शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांना धक्काबुक्की केली. त मनसेने आग्रीपाडा पोलीस ठाणे आणि वरळी येथील पोलीस ठाण्यामध्ये शिंदे गटाविरोधात तक्रार दाखल केली.



# शिर्डीत महाविद्यालयीन विद्यार्थिनींकडून बोगस मतदान! काँग्रेसचा आरोप

■ शिर्डी

**शिर्डी** विधानसभा मतदारसंघात महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी बोगस मतदान केल्याचा आरोप शिर्डीतील काँग्रेसच्या उमेदवार प्रभावती घोगरे यांनी केला. याबाबत निवडणूक आयोगाकडे तक्रार केल्याची माहिती काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांनी दिली. लोणी येथे महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थिनींनी मतदान करत असल्याचे दोन ते तीन व्हिडीओ प्रभावती घोगरे यांनी व्हायरल केले आहेत. या विद्यार्थिनींकडे मतदार ओळखपत्रदेखील आढळले असून या एका व्हिडीओत प्रभावती घोगरे एका विद्यार्थिनीला म्हणतात की, तू कुठून आलीस? त्यावर या विद्यार्थिनीने उत्तर देते की, मी धुळ्याहून आले आहे. त्यानंतर प्रभावती घोगरे तिला विचारतात की, धुळ्यात राहायला आहेस, तर इथे मतदान करण्यास कशी आलीस? त्यावर ही विद्यार्थिनी सांगते की, मी येथे प्रवरा मेडिकल महाविद्यालयात शिकत आहे. त्यानंतर या विद्यार्थिनी तिथून निघून जातात. याबाबत तक्रार आल्यानंतर निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी असे स्पष्टीकरण केले की, आम्ही चौकशी केली. हे विद्यार्थी शिर्डीचे रहिवासी असून ते या मतदारसंघातीलच मतदार आहेत.

# भगव्या टोप्यांवरून तणाव

■ कोल्हापूर

**कोल्हापुरमध्ये** शिरोली मतदान केंद्रावर मतदार भगव्या टोप्या घालून आल्याने मोठा वाद झाला. या मतदारांना पोलिसांनी भगव्या टोप्या काढण्यास सांगितले होते. मात्र यास थेट नकार देऊन भगवी टोपी घालूनच मतदान करण्याचा मतदारांनी पवित्रा घेतला. तसेच गोल टोपी आणि हिजाब घालून येणाऱ्या मतदारांनाही विरोध करा अशी मागणी केली. यावरून हिंदुत्ववादी कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झाल्यामुळे या परिसरात तणावाचे वातावरण झाले होते.





# 'एलआयसी'च्या संकेतस्थळाचे हिंदी मुखपृष्ठ! स्टॅलिन नाराज

■ चेन्नई

**जीवन** विमा निगम (एलआयसी)च्या संकेतस्थळाचे मुखपृष्ठ केवळ हिंदी भाषेतच दिसत असून हा हिंदीची सक्ती करण्याचा प्रकार असल्याचे सांगत तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के.स्टॅलिन यांनी याचा निषेध केला आहे. त्यांनी आपली नाराजी समाजमाध्यमावर व्यक्त केली असून या संकेतस्थळाच्या मुखपृष्ठाचा स्क्रीन शॉट्ही शेअर केला आहे.

समाजमाध्यमावरील आपल्या प्रतिक्रियेत त्यांनी म्हटले आहे की, हे संकेतस्थळ एका प्रकारे हिंदीचा प्रसार करण्यासाठीच वापरले जात आहे. इंग्रजी भाषा निवडण्याचा पर्यायही हिंदी भाषेत देण्यात आला आहे. देशाच्या भाषिक स्वातंत्र्यावर घाला घालण्याचा हा प्रकार असून या संकेतस्थळाच्या माध्यमातून हिंदी न बोलणाऱ्यांचा अपमान करण्यात आला आहे. स्टॅलिन यांच्याप्रमाणेच इतरही अनेक नेत्यांनी एलआयसीचा निषेध केला आहे. या बाबत स्पष्टीकरण देताना एलआयसीने म्हटले आहे की, संकेतस्थळावरील भाषा बदलण्याच्या पर्यायात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे तो उपलब्ध नव्हता. त्यामुळे झालेल्या त्रासाबद्दल दिलगिरी व्यक्त करत आहे. हा तांत्रिक बिघाड दुरुस्त झाला असून हे संकेतस्थळ आता हिंदी व इंग्रजी या दोन्ही भाषांत उपलब्ध झाले आहे.

# जळगावच्या राज मालती नगरात जुन्या वादातून तरुणाची हत्या

■ जळगाव

**राज** मालती नगरमधील विकास डेअरीच्या कॉर्नरला असलेल्या मंडपाजवळ जुन्या वादातून दोन गटात झालेल्या मारहाणीत तरुणाची हत्या झाल्याने एकच खळबळ उडाली. ही घटना आज सकाळी घडली. सिद्धार्थ वानखेडे (३६), असे मृत तरुणाचे नाव आहे.

जुन्या वादातून दोन गटांत तुफान हाणामारी झाली. त्यात विशाल सुरवाडे (२८), जानू संजू पाटील (२८), फैजन राजू पाटील (२४) आणि मेहमूद हाजी बिस्मिल्ला पटेल (४२) हे सर्व जखमी झाले. सिद्धार्थ वानखेडे यांचा मृत्यू झाला. जखमींना तातडीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. घटनास्थळी एका व्यक्तीचे आधारकार्ड आणि लाकडी बांबू रक्ताने माखलेला आढळला.

# उमेदवारांच्या प्रचारात सहभाग ९ पालिका कर्मचारी निलंबित



■ भिवंडी

**ठाणे** जिल्ह्यातील भिवंडी महापालिकेतील ९ सफाई कर्मचाऱ्यांचा विधानसभा निवडणुकीतील उमेदवारांच्या प्रचारात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभागी झाल्याच्या तक्रारीवरून त्यांना तत्काळ निलंबित केल्याची माहिती पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी दिली.प्रत्यक्ष मतदानाच्या एक दिवस आधी घडलेल्या या घटनेने पालिका वर्तुळात खळबळ उडाली आहे.

भिवंडी महापालिकेच्या स्वच्छता व आरोग्य विभागातील सफाई सहाय्यक आरोग्य निरीक्षक शशिकांत घाडगे, सफाई कामगार सुभाष दोंदे, लक्ष्मण घाडगे, संदीप गायकवाड, तुषार शेलार, लिलाधर जाधव, विनायक खोडे, आदिती डुंबरे, मुकेश सुर्वे यांनी विधानसभा निवडणुकीतील उमेदवारासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग घेतल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून मिळाल्याने चौकशीच्या अधीन राहून पालिकेचे आयुक्त अजय वैद्य यांनी या कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे. उमेदवाराच्या प्रचारात त्यांनी सहभाग घेतल्याची तक्रार पुराव्यासह शहरातील एका सुज्ञ नागरिकाने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे केली.या तक्रारीची दखल घेत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी या कर्मचाऱ्यांवर पुढील कारवाई करण्यासाठी कर्मचाऱ्यांची नावे पालिका आयुक्तांकडे पाठविली होती.या कर्मचाऱ्यांचे निलंबन झाल्याने पालिका कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# दादर, शिवडीत मतदान यंत्र बिघडले

■ मुंबई

**मुंबईत** दादर येथे ईव्हीएम बंद पडल्याने मतदान खोळंबले होते. नाबर विद्यालयातील ईव्हीएम मशीन बंद पडले. मतदान सुरू होऊन अवघी १५ मिनिटे झाली असताना मशीन बंद पडले. यामुळे मतदारांचा खोळंबा झाला. तर शिवडी-लालबाग विधानसभा मतदारसंघातील आरएम भट शाळेतील मतदान केंद्र क्रमांक ४१ चे मशीन बंद पडली होती. तर बोरिवलीतील प्रबोधनकार ठाकरे उद्यान येथील मतदान केंद्रावर विद्युत पुरवठा अपुरा असल्यामुळे मतदान सुरू होऊ शकले नाही.

# इगतपुरीत भलत्याच उमेदवाराला मत

■ इगतपुरी

**इगतपुरी** मतदारसंघातील तळेगाव येथील मतदान केंद्रावरही ईव्हीएममुळे दुसऱ्याच उमेदवाराला जात असल्याचा आरोप मतदारांनी केला. त्यामुळे मतदान केंद्रावर गोंधळ निर्माण झाला होता. नागरिकांच्या तक्रारीमुळे काही काळ मतदान थांबविले होते. त्यानंतर निवडणूक आयोगाचे अधिकारी आणि स्थानिक पोलीस प्रशासन मतदान केंद्रावर दाखल होऊन तपासणी केली व यंत्रात दुरुस्ती केली.

# केंद्रीय मंत्री रामदास आठवलेंसोबत मतदान केंद्रावर भेदभाव

■ मुंबई



**कार्यकर्त्यांचा आरोप**

**केंद्रीय** मंत्री रामदास आठवले यांनी मतदार केंद्रावर भेदभाव झाला असल्याची तक्रार निवडणूक आयोगाकडे केली आहे. रामदास आठवले आज दुपारी वांद्रे पूर्व येथील गांधीनगर परिसरातील नवजीवन विद्या मंदिर येथील मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी आले होते.

यावेळी मतदान केंद्रावर अनेक उमेदवार व नेत्यांचे फोटो काढण्यात येत होते. मात्र रामदास आठवले यांच्यासोबत एकाही फोटोग्राफरला केंद्राच्या आतमध्ये सोडले नाही. त्यानंतर त्यांच्या कार्यकर्त्यांनी निवडणूक आयोगाचे अधिकृत परवानगी असलेल्या फोटोग्राफरला आतमध्ये सोडण्याची विनंती केली, मात्र तरीही पोलिसांनी परवानगी नाकारली. त्यामुळे हा रिपब्लिकन पक्षासोबत दुजाभाव झाल्याचा आरोप आठवले समर्थकांनी केला. या घटनेनंतर रामदास आठवले यांच्या कार्यालयाने वांद्रे विधानसभा मतदारसंघ नवजीवन विद्यामंदिर मतदान केंद्रावर कर्तव्यावर तैनात असलेल्या पोलिसांनी दुजाभाव केल्याची तक्रार निवडणूक आयोगाकडे केली.

# नांदगावात नोटांनी भरलेली गाडी पकडली

■ नाशिक

**नांदगाव** मतदारसंघातील साकोरा येथे अपक्ष उमेदवार रोहन बोरसे यांच्या कार्यकर्त्यांनी पैसे असलेली गाडी पकडली. नांदगाव मतदारसंघातील साकोरा येथे मतदान केंद्राबाहेर थांबलेल्या गाडीत पैसे असल्याचा संशय अपक्ष उमेदवार रोहन बोरसे यांच्या कार्यकर्त्यांना आला. कार्यकर्त्यांनी गाडीची झडती घेतली असता गाडीत रोख रक्कम सापडली. कार्यकर्त्यांनी गाडी पकडताच चालक घटनास्थळावरून फरार झाला. यानंतर एक कार्यकर्ता हातात नोटा घेऊन गाडीच्या टपावर चढला. त्याने काही नोटा फाडून फेकून दिल्या. या घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि निवडणूक अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर पोलिसांनी तीन जणांना ताब्यात घेतले असून गाडी आणि रोकड जप्त केली. ही गाडी व पैसे कोणाचे आहेत, याची चौकशी पोलीस करत आहेत.

# ईव्हीएमच्या बॅटरी खराब झाल्या

■ बुलडाणा

**बुलडाण्यातील** खामगाव मतदारसंघातील गेरू माटरगाव व श्रीधर नगर येथील दोन मतदान केंद्रावरील मतदान यंत्राच्या बॅटरी खराब झाल्याने मतदान थांबवले होते. तर दुसरे मतदान यंत्रदेखील या ठिकाणी पोहोचले नव्हते. त्यामुळे मतदारांनी मतदारसंघात गोंधळ घातला होता. त्यानंतर सीपीयु आणि व्हीव्हीपॅट युनिट बदलल्यानंतर मतदान प्रक्रिया पुन्हा सुरु झाली.

# ५ वर्षांनंतर पुन्हा सुरू होणार कैलास मानसरोवर यात्रा?

■ नवी दिल्ली

**भारत**-चीन सीमेवरील तणाव निवळल्यानंतर पाच वर्षांपासून खंडित झालेली कैलास-मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू होण्याचे संकेत मिळाले आहे. ब्राझीलच्या रिओ डी जानेरोमध्ये जी-२० राष्ट्रांच्या शिखर परिषदेदरम्यान भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर आणि चीनचे परराष्ट्र मंत्री वँग यी यांच्या भेटीत यात्रा पुन्हा सुरू करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली,अशी माहिती सूत्रांनी दिली.

भारत-चीन दरम्यानच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेलगत पूर्व लडाखमधील देपसँग आणि डेमचोकमधून दोन्ही देशांच्या फौजा शांतता करारांतर्गत मागे घेण्यात आल्यानंतर उभय देशांमध्ये झालेली ही पहिलीच उच्चस्तरीय बैठक होती. या बैठकीत कैलास मानसरोवर यात्रा,तसेच भारत-चीन दरम्यान थेट विमानसेवा पुन्हा सुरू करण्याबाबत चर्चा झाली. कैलास मानसरोवर यात्रेचे दोन अधिकृत मार्ग पाच वर्षांपासून बंद आहेत. नेपाळमधून जाणारा खासगी मार्ग गेल्या वर्षी खुला झाला आहे. मात्र त्या मार्गाचा वापर करण्याची परवानगी भारतीय नागरिकांना नाही. त्यामुळे दोन अधिकृत मार्ग खुले केल्यास यात्रा पुन्हा सुरू होऊ शकेल. कोरोना महामारीच्या काळात बंद करण्यात आलेली थेट विमानसेवा लॉकडाऊन उठविल्यानंतरही पुन्हा सुरू झालेली नाही. तीदेखील सुरू होण्याची शक्यता आहे.

# चंद्रपूरमध्ये भाजपा- काँग्रेस कार्यकर्त्यांत बाचाबाची

■ चंद्रपूर

**चंद्रपूर** जिल्ह्यातील चिमूर शहरात आज भाजपा काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाली. चंद्रपूरच्या चिमूर शहरातील मतदान केंद्र असलेल्या जिल्हा परिषद कन्या शाळा येथे मतदारांना मदत करण्याकरीता काँग्रेस व भाजपा कार्यकर्ते मतदारांची यादी घेऊन उभे होते. त्यानंतर सकाळी ९ वाजताच्या सुमारास आमदार बंटी भांगडिया, माजी आमदार मितेश भांगडिया या ठिकाणी आले.

# नाशिक, पुण्यात ईव्हीएममधील बिघाडाचा मतदानाला फटका

■ नाशिक

**नाशिक** जिल्ह्यात अनेक मतदान केंद्रातून ईव्हीएम बिघाडाच्या तक्रारी आल्या. येवल्यात जनता महाविद्यालयातील मतदान यंत्रात बिघाड झाल्याने मोठ्या प्रमाणात नागरिकांच्या रांगा लागल्या होत्या. पंचवटीतील सोनुबाई केला मतदान केंद्रावर मतदान यंत्रात तांत्रिक बिघाडामुळे मतदानाला अर्धा तास उशीर झाला. पुण्यात कोथरूड येथे एका मतदान केंद्रावर ईव्हीएममध्ये बिघाड झाला. त्यामुळे या ठिकाणी उशिरा मतदान सुरू झाले.

छत्रपती संभाजीनगरमध्येदेखील ईव्हीएममध्ये बिघाड झाल्यामुळे चार ठिकाणी मतदान प्रक्रिया थांबली. पीर बावडा, फुलंब्री मतदान केंद्रावर ईव्हीएममध्ये बिघाड झाला. तर आणखी २ ठिकाणी कंट्रोल युनिटमध्ये बिघाड झाला. तर एका ठिकाणी व्हीव्हीपॅट ४ ठिकाणी बॅलेट मशीनमध्ये बिघाड झाला. त्यामुळे मतदान रखडले होते.

अकोला जिल्ह्यातील बाळापूर मतदार संघातील वाडेगाव येथील मतदान केंद्र क्रमांक २०८ वर दुपारपर्यंत मतदानाला सुरुवात झाली नव्हती. तांत्रिक बिघाडामुळे सकाळी मतदान केंद्रात आलेले मतदार वैतागून मतदान न करता घरी निघून गेले.

# जामनेरमध्ये ईव्हीएममध्ये बिघाडामुळे अर्धा तास विलंब

**जळगाव** - जळगावच्या जामनेरमधील मतदान केंद्रावर देखील ईव्हीएम मशीन बंद पडल्याने मतदान रखडले. न्यू इंग्लिश स्कूल मतदान केंद्रावर मतदान यंत्र सुरू होत नव्हते. त्यामुळे अर्धा तास उशिरा या ठिकाणी मतदान सुरू झाले. ईव्हीएम मधील बिघाड दुरुस्त करण्यासाठी कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या वतीने तांत्रिक कर्मचाऱ्यांना बोलावण्यात आले.

# चंदेरी च्वींगम

## वेगवेगळे शेड्स असलेली भूमिका!



झी मराठी वाहिनीवरील 'लाखात एक आमचा दादा' मालिकेत सूर्याच्या आयुष्यात खळबळ माजवायला **समीर निकम** उर्फ पंटर पिंट्या येणार आहे. ही व्यक्तीरेखा अधोक्षज कऱ्हाडे साकारत आहे. यानिमित्त त्याच्याशी साधलेला संवाद...

**तुझ्या भूमिकेबद्दल काय सांगशील?**

'लाखात एक आमचा दादा' मालिकेत माझ्या भूमिकेचं नाव समीर निकम उर्फ पंटर पिंट्या आहे. नावाप्रमाणे तो अगदीच पंटर आहे. लहानपणापासूनच तो चोरी, पाकीटमारी किंवा कागदपत्र गायब करणे असे छोटे गुन्हे करत आला आहे, आणि यासाठी त्याला अनेकदा जेलमध्ये ही रहावं लागलं आहे. पण तो तो मनाने अगदी साधा भोळा, प्रामाणिक आहे पण परिस्थितीमुळे त्याला हा मार्ग स्वीकारावा लागलाय. जालिंदर निंबाळकर उर्फ डॅडी यांनी एका विशेष कामगिरीसाठी पिंट्याची जेलमधून सुटका केली आहे. शत्रूला तेजश्रीशी लग्न करायचे आहे, पण तेजश्रीला हे मान्य नाही म्हणून जालिंदरने पिंट्याला म्हणजेच समीर नाईकला उभं केलंय. समीरच लग्न तेजूशी ठरवलं जात. हे पात्र नकारात्मक किंवा सकारात्मक आहे असं म्हणता येणार नाही कारण या भूमिकेच्या वेगवेगळ्या शेड्स आहेत.

**तुझी निवड कशी झाली?**

या मालिकेत निवड होण्यासाठी झी मराठीची आणखीन एक मालिका कारणीभूत आहे असं मी म्हणेन, ३-४ वर्षापूर्वी मी 'घेतला वसा टाकू नको' नावाची मालिका करत होतो. त्या मालिकेचा क्रिएटिव्ह डायरेक्टर जो या मालिकेवर ही काम करत आहे त्याने माझं काम पाहिलं होतं. त्याने माझं नाव सजेस्ट केले. त्या दिवशी मी सासुरवाडीला कोल्हापूरला निघत होतो. तेव्हाच मला या भूमिकेसाठी कॉल आला. मी लगेच होकार दिला. महालक्ष्मी अंबाबाईच्या दर्शन करून बाहेर येताच माझी निवड झाल्याचा कॉल आला आणि आज रात्रीच तुला साताऱ्याला पोहचायचे आहे. असे मला सांगण्यात आले. मी रात्रीच प्रवास करून पोहचलो आणि दुसऱ्या दिवशी पासून माझं शूटही सुरु झालं.

**भूमिकेला कसा प्रतिसाद मिळत आहे?**

प्रेक्षकांकडून आणि मित्र परिवाराकडून खूप छान प्रतिसाद मिळत आहे. माझा भाऊ संकर्षणने माझ्यासाठी खूप छान पोस्ट टाकली होती ज्यामुळे मी ही भूमिका करत आहे हे अधिक लोकांपर्यंत पोहोचलं. जो प्रतिसाद मिळत आहे तो उत्तम आहे, लोक आपल्या कामाची स्तुती करत आहेत तर बरं वाटतंय आणि आता माझी जबाबदारी आहे की मी अजून छान काम करत रहावं.

**तुझी अभिनय प्रवासाची सुरुवात कधी झाली?**

माझ्या अभिनय प्रवासाची सुरुवात २०१५ पासून झाली आणि याचं श्रेयसुद्धा झी मराठीलाच जाईल. २०१४-१५ मध्ये 'अस्मिता' नावाच्या मालिकेमध्ये मी ज्युनिअर आर्टिस्ट म्हणून सुरुवात केली. झी मराठीशी एक वेगळंच नातं आहे. फक्त एक कलाकार म्हणूनच नाही तर निवेदक म्हणूनही मी झी मराठीचे बरेच प्रमोशनल कार्यक्रम केले आहेत. त्याच्यामुळे खऱ्या अर्थाने झी मराठी माझी माय मराठी आहे.

**सहकलाकारांसोबत काम करण्याचा अनुभव कसा आहे?**

सर्वांशी खूप छान बॉन्डिंग जमायला लागलंय. बरेच कलाकार असे आहेत जे माझ्या ओळखीचे आहेत. गिरीश ओक सरांसोबत मी आधीपण काम केलंय. आणि दिशासोबत माझ्या झी मराठीच्या महाराष्ट्राचा सुपरस्टार या रिॲलिटी शो मध्ये भाग घेतला होतो आणि तिथे आमची जोडी होती. मालिकेत शत्रू आणि सुमेधा ताई आहे त्यांच्यासोबत ही छान बॉन्डिंग व्हायला लागलंय. या मालिकेत सगळी कलाकार मंडळी खूप अनुभवी असून प्रत्येकाकडून शिकण्यासारखं खूप आहे.

## 'बागी ४' मध्ये टायगरचा रावडी लूक

टायगर श्रॉफची सुपरहिट फ्रँचायझी असलेल्या 'बागी ४' या चित्रपटाची आज घोषणा करण्यात आली. या चित्रपटाच्या पोस्टरमध्ये टायगर श्रॉफ बाथरुमच्या कमोडवर बसलेला आहे. त्याच्या एका हातात कोयता तर दुसऱ्या हातात दारुची बाटली दिसत आहे. त्याच्या समोर दोन-तीन लोक मेलेली दिसत आहेत. भिंतीवर रक्ताचे डाग पडलेले दिसतात. साजिद नाडियादवाला यांनी पुन्हा एकदा निर्मितीची धुरा सांभाळली आहे. ए हर्षा यांनी चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे.




## निखिल राजेशिर्के लग्नबंधनात

रंग माझा वेगळा, अरुंधती, छोटी मालकीण, माझी तुझी रेशीमगाठ अशा कलाकृतींमधून झळकलेल्या आणि बिग बॉसच्या चौथ्या पर्वामुळे चर्चेत आलेल्या अभिनेता निखिल राजेशिर्के याचा रविवारी लग्नसोहळा पार पडला. चैत्राली मोरे हिच्यासोबत पारंपरिक पद्धतीने निखिलने लग्नगाठ बांधली. यावेळी त्याचे नातेवाईक आणि जवळची मित्रमंडळी उपस्थित होती. लग्नगाठ बांधल्यानंतर या जोडीवर सर्वत्र शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



## मुरलेल्या प्रेमाचा गोडवा चाखवणार 'गुलकंद'

'गुलकंद' हा मुरलेल्या प्रेमाचा गोडवा चाखवणारा चित्रपट नवीन वर्षात १ मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतीच या चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. सचिन मोटे लिखित, सचिन गोस्वामी दिग्दर्शित या चित्रपटात फॅमिली एंटरटेनमेंट चित्रपटात सई ताम्हणकर, समीर चौघुले, ईशा डे, प्रसाद ओक, वनिता खरात, मंदार मांडवकर, जुई भागवत, तेजस राऊत, शार्विल आगटे अशी तगडी स्टारकास्ट असणार आहे. चित्रपटाबद्दल निर्माते, दिग्दर्शक सचिन गोस्वामी म्हणतात, ''हा चित्रपट एक फॅमिली एंटरटेनर असून प्रेक्षकांना या मुरलेल्या गुलकंदाची चव चाखायला नक्कीच आवडेल. ही एक अशी कथा आहे, ज्याची लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळेच मजा घेऊ शकतात.''




## मृणाल दुसानीस हॉटेल व्यवसायात






मराठी अभिनेत्री अभिनयासोबत आता काहीतरी साईड बिजनेस देखील करत आहेत. या यादीत आता अभिनेत्री मृणाल दुसानीसचा देखील समावेश झाला आहे. नुकतेच तिने आपल्या पतीसोबत ठाण्यात नवीन हॉटेल सुरू केले. हिरानंदानी इस्टेट येथे हे हॉटेल असून त्याचे नाव बेली लाफ्स असे आहे. या हॉटेलचा विंटेज लूक लक्ष वेधून घेत आहे. तिच्या हॉटेलचे फोटो व्हायरल झाले असून कलाकारांसह चाहत्यांनी तिला शुभेच्छा दिल्या आहेत. अभिनयाच्या बाबतीत बोलायचे तर स्टार प्रवाहवरील 'लग्नानंतर होईलच प्रेम' या नव्या मालिकेद्वारे ती चार वर्षांनी छोट्या पडद्यावर पदार्पण करत आहे.

## नोरा फतेही पुन्हा हनी सिंहसोबत




बॉलिवुड अभिनेत्री नोरा फतेही एका नव्या गाण्यात दिसणार आहे. प्रसिद्ध गायक यो यो हनी सिंह याच्यासोबत ती 'पायल' या गाण्यात एकत्र आली आहे. हे नवे गाणे आज सोमवारी रिलीज झाले. त्याआधी या गाण्याचा टीझर रविवारी रात्री उशिरा सोशल मीडियावर निर्मात्यांनी पोस्ट केला होता. यात यो यो हनी सिंह आणि नोरा फतेही दिसत आहेत. या गाण्याचा टीझर इन्स्टाग्रामवर पोस्ट करताना निर्मात्यांनी यो यो हनी सिंह, नोरा फतेही आणि गायक पॅराडॉक्स यांना टॅग केले आहे. हनी सिंह आणि नोरासोबत यांनी हा व्हिडीओ ३ एवढ्या थंडीत शूट केला आहे, असं बोललं जातंय. याबाबत हनी सिंह म्हणतो, प्रचंड थंडी होती. पण नोरासुद्धा बिनधास्त शूटिंग करत होती. तिच्या मेहनतीचे कौतुक करावेच लागेल. या गाण्यात नोहासोबत डान्सर मुली होत्या, पण थंडीमुळे त्या आल्या नाहीत. पण नोराने एकटीने ते सीन्स केले.




## बर्थडेला नयनताराने दिले दोन रिटर्न गिफ्ट


साऊथ सिनेमाममधली लेडी सुपरस्टार नयनतारा हिचा आज (१८ नोव्हेंबर) वाढदिवस... या निमित्ताने तिने चाहत्यांना दोन रिटर्न गिफ्ट्स दिली आहेत. पहिले गिफ्ट म्हणजे 'रक्कयी' या तिच्या आगामी सिनेमातला फर्स्ट लुक दाखवणारा व्हिडीओ आणि पोस्टर तिने इन्स्टाग्रामवर शेयर केलेय. यासोबतच तिने दुसरी भेट देत नेटफ्लिक्सवर येणाऱ्या आपल्या 'नयनतारा : बियॉन्ड द फेयरीटेल' या बायोग्राफी डॉक्युमेंट्रीचेही पोस्टर रिलीज केले आहे. नयनताराच्या या दोन्ही प्रोजेक्टबाबत चाहते प्रचंड उत्साहित आहेत. या दोन्ही पोस्ट्स तिने वाढदिवसाच्या आदल्या रात्री सोशल मीडियावर टाकल्या आहेत. पहिल्या पोस्टरवर मोठ्या अक्षरात लिहिलेय, 'तिने महायुद्धाची घोषणा केली...' या पोस्टरमध्ये ती एका बाजूला एकटी उभी असून तिच्या हातात मोठा भाला आहे. समोर प्रचंड संख्येने शत्रूचे लोक आहेत. कॅप्शनमध्ये ती म्हणतेय, 'क्रूर लोकांविरुद्ध लढाई...' यानंतर रात्री १२ वाजल्यानंतर तिने आपल्या बायोग्राफीचे पोस्टर टाकले आहे.

## इफ्फी फेस्टीवलमध्ये एकच मराठी सिनेमा

गोव्यात होत असलेल्या यंदाच्या इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऑफ इंडियामध्ये (इफ्फी) यंदापासून पदार्पण करणाऱ्या दिग्दर्शकाचा सर्वोत्कृष्ट चित्रपट हा पुरस्कार देण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी सात चित्रपट स्पर्धेत असून त्यात 'जिप्सी' हा एकच मराठी सिनेमा आहे. पुरस्काराच्या या स्पर्धेत शशी खंदारे यांनी दिग्दर्शित केलेला 'जिप्सी' हा चित्रपटही टक्कर देणार आहे. 'इफ्फी' हा केंद्र सरकारचा अधिकृत चित्रपट महोत्सव आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरही या महोत्सवाला विशेष प्रतिष्ठा आहे. या विभागातील विजेत्याला मानाचा रौप्य मयूर, १० लाख रुपये रोख आणि सन्मानपत्र देऊन सन्मानित केले जाणार आहे. भारतीय चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांच्या अध्यक्षतेखाली सिंगापूरचे दिग्दर्शक आणि पटकथाकार अँथनी चेन, अमेरिकन-ब्रिटीश चित्रपट निर्मात्या एलिझाबेथ कार्लसन, स्पॅनिश निर्माते फ्रान बोर्गिया तसेच ऑस्ट्रेलियाचे संकलक जिल बिलकॉक यांचे मंडळ विजेत्याची निवड करणार आहे.




## ऋतिकच्या 'वॉर-२'मध्ये श्रद्धा कपूरचा आयटम



यशराज फिल्म्सच्या दोन चित्रपटांचे काम सध्या जोरात सुरू आहे. 'वॉर २' आणि 'अल्फा'. यातल्या 'वॉर-२' सिनेमातील ऋतिक रोशन आणि ज्यु. एनटीआर यांच्यातला महत्वपूर्ण सीन सध्या फिल्मावला जातोय. त्याच दरम्यान या सिनेमात श्रद्धा कपूर एका आयटम साँगमध्ये धमाल करणार आहे, असे वृत्त हाती आले आहे. याआधी या सिनेमातील एक गाणे ऋतिक रोशन आणि कियारा आडवाणी यांच्यावर चित्रीत करण्यात आलेच आहे. आता आयटम साँगसाठी श्रद्धा कपूरला फायनल करण्यात आल्याचे कळते. या गाण्यात दोन्ही सुपरस्टार दिसणार आहेत, जो सिनेमाच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरू शकतो. म्हटलं जातंय की अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा-२' सिनेमातही श्रद्धाला आयटम साँगसाठी ऑफर आली होती, पण तिने मोठे मानधन मागितल्याने ते शक्य होऊ शकले नाही. यशराज फिल्म्सने तिची मागणी पूर्ण केली असावी, असेही सुत्रांनी स्पष्ट केले.

नवाकाळ
• पुणे | गुरुवार २१ नोव्हेंबर, २०२४ • पान - ८

थोडक्यात...

## धुळ्यात १० हजार चांदीच्या विटा पकडल्या

**धुळे** - विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठिकठिकाणी वाहनांची तपासणी होत असून, धुळ्यात एका कंटेनरमध्ये दहा हजार चांदीच्या विटा आढळून आल्या आहेत. या विटा एचडीएफसी बँकेच्या असल्याचे सांगण्यात येत असून पोलीस त्याची चौकशी करत आहेत. धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील थाळनेर येथे पोलिसांनी या कंटेनरची तपासणी केली होती. यावेळी या विटा आढळल्या असून, त्याची बाजारातील किंमत ९४ कोटी ६८ लाख रुपये आहे.

## राधानगरीत ईव्हीएममध्ये बिघाड मशालऐवजी धनुष्यबाणाला मत

**कोल्हापूर-** कोल्हापूरच्या राधानगरी विधानसभा मतदारसंघातील बर्गेवाडी गावातील मतदान केंद्रात मतदारांनी मशालचे बटन दाबले असता धनुष्यबाणाला मत जात होते. ही बाब के. पी. पाटील यांच्या समर्थकांना समजली. याबाबतची तक्रार समर्थकांनी केंद्रातील कर्मचाऱ्यांकडे केली. मात्र कर्मचाऱ्यांनी याची दखल घेतली नाही. हा गोंधळ एक तास सुरुच होता. त्यानंतर के. पी. पाटील मतदान केंद्रावर आले आणि त्यांनी आक्षेप घेतला. त्यानंतर कर्मचाऱ्यांनी ईव्हीएम मशीनमधील तांत्रिक बिघाड दुरुस्त केला. कर्मचाऱ्यांनी सांगितले की, हा एक तांत्रिक चूक होती. ती आता आम्ही दुरुस्ती केली आहे.

## नेरुळमधील केंद्राबाहेर लॅपटॉप-राऊटर सापडले

**नवी मुंबई-** विधानसभेचे मतदान सुरू असतानाच नवी मुंबईतील नेरुळमध्ये शिवाजीनगर केंद्राबाहेर एका गाडीत काही संशयास्पद हालचाली दिसल्या. या गाडीची पोलिसांनी तपासणी केल्यानंतर राऊटर, लॅपटॉपसह इतर साहित्य सापडले. त्यानंतर मतदान मशीन हॅक करणारी यंत्रणा असावी या संशयावरून तुर्भे पोलिसांनी गाडीसह एकाला ताब्यात घेतले. याप्रकरणी पोलिसांनी चौकशी केली असता मोबाईलमधील चीप टेस्ट करण्यासाठी लागणारी ही सामग्री आहे, असे संबंधित कर्मचाऱ्याने सांगितले. पोलीस अधिकाऱ्यांनीही नंतर असा खुलासा केला की, पोलिसांनी गाडीतून जप्त केलेल्या सर्व वस्तू या मार्कोस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या आहेत. याचा वापर करून मोबाईलमधील चीप टेस्ट करण्याचे काम केले जाते. ही यंत्रणा मतदार केंद्रावर हॅकिंगसाठी आणण्यात आली नव्हती.

## दक्षिण सोलापुरातून शिंदे कुटुंबियाचा अपक्षाला पाठिंबा

**सोलापूर-** विधानसभा निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी आज सकाळी ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे आणि खासदार प्रणिती शिंदे यांनी दक्षिण सोलापूर मतदारसंघातील अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांना पाठिंबा दिला. त्यामुळे उद्धव ठाकरे गटाला एकच धक्का बसला. दक्षिण सोलापुरात ठाकरे गटाने अमर पाटील यांना उमेदवारी दिली. काँग्रेसचे दिलीप माने येथून लढण्यास इच्छुक होते. तर, सिद्धेश्वर परिवाराचे प्रमुख धर्मराज काडादी यांनी अपक्ष अर्ज दाखल केला होता. यातच प्रणिती शिंदे यांनी आज सकाळी अखेरच्या क्षणी धर्मराज काडादी यांच्या पाठीशी असल्याचे सांगितले.

# अदानी नवी मुंबई विमानतळाजवळ सेंटर उभारणार



**मुंबई -** उद्योगपती गौतम अदानी यांच्या अदानी रिॲलिटी कंपनीकडून मुंबई व नवी मुंबईत अनेक जमिनींचा विकास केला जाणार आहे. त्यातच नवी मुंबई विमानतळाजवळ अदानीने मोठी जमीन घेतली असून, त्यावर ते एक भव्य कन्व्हेंशन सेंटर उभारणार आहेत. या केंद्रात एकाच वेळेस २५ हजार लोक उपस्थित राहू शकतील. नवी मुंबई विमानतळाजवळील कन्व्हेंशन केंद्र हे बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्समधील मुकेश अंबानी यांच्या वर्ल्ड कन्व्हेंशन केंद्राच्या धर्तीवर उभारण्यात येणार आहे. यामध्ये पंचतारांकित हॉटेल, कॉर्पोरेट सभागृहे त्याचप्रमाणे अनेक व्यापारी तसेच कार्यालयीन हॉल तयार करण्यात येणार आहेत. अदानी रिॲलिटीने वांद्रे-वरळी सिलिंक जवळील २४ एकर जागाही खरेदी केली असून, या ठिकाणीही एक बहुपयोगी संकुल उभारण्यात येणार आहे. साडेचार लाख वर्ग फुटांच्या या जागेपैकी साडेतीन लाख वर्गफूट जागा रहिवासी संकुलासाठी वापरण्यात येणार आहे.



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्नी व आईसह मतदानाचा हक्क बजावला.



उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्नी रश्मी व मुले तेजस, आदित्य यांच्यासोबत मतदान केले.



रिपाइंचे रामदास आठवले यांनी पत्नी सीमासोबत मतदानाचे कर्तव्य पार पाडले.



भाजपाचे खासदार पियुष गोयल यांनी सहपरिवार मतदान केले.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सहपरिवार मतदानाचे कर्तव्य पार पाडले.




मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर यांनीही आपल्या कुटुंबासमवेत मतदानाचा हक्क बजावला.



भाजपा नेते किरीट सोमय्या यांनीही आपल्या पत्नी व मुलांसह मतदान केले.




राज्य निवडणूक आयोगाचे प्रमुख चोकलिंगम मतदान केंद्रावर वृद्ध मतदाराला मदत करताना.



मनसे प्रमुख राज ठाकरे यांनीही मतदानाचा हक्क बजावला.



भजन सम्राट अनुप जलोटा यांनी मतदान केले.




महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन मतदान करताना.

(सर्व छाया : दीपक साळवी)

# अक्षय कुमारने विधानसभेसाठी पहिल्यांदाच मतदान केले!

■ मुंबई

**विधानसभा** निवडणुकीसाठी आज मतदान पार पडले. सर्वसामान्य नागरिकांपासून ते विख्यात व्यक्तींपर्यंत अनेकांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. विशेष म्हणजे अभिनेता अक्षय कुमारने यानेही विधानसभा निवडणुकीसाठी मुंबईत मतदान केले. ५६ वर्षीय अक्षयने अनेक वर्षे निवडणुकीत भारतात मतदान केले नव्हते. कारण त्याच्याकडे कॅनेडियन नागरिकत्व होते आणि त्यावरून अनेकदा त्याच्यावर टीका होत होती. अखेर गेल्या वर्षी त्याने कॅनडाचे नागरिकत्व सोडून भारताचे नागरिकत्व घेतले. त्यानंतर आज त्याने विधानसभेसाठी मतदान केले.



# शिरसाट यांची मतदान केंद्राबाहेर ठाकरे गटाच्या कार्यकर्त्याला धमकी

अंबादास दानवेंकडून व्हिडिओ पोस्ट

■ छत्रपती संभाजीनगर

**छत्रपती** संभाजीनगर मतदारसंघाच्या उस्मानपुरा मतदान केंद्राबाहेर शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी ठाकरे गटाच्या कार्यकर्त्याला धमकी दिली. याबाबतचा व्हिडिओ ठाकरे गटाचे नेते आणि विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पोस्ट केला. या घटनेनंतर धमकी मिळालेल्या कार्यकर्त्याने सांगितले की, याप्रकरणी मी पोलीस आयुक्तांची भेट घेणार असून, माझ्या जिवाचे काही बरेवाईट झाल्यास संजय शिरसाट जबाबदार असतील.

या व्हिडिओत संजय शिरसाट ठाकरे गटाच्या कार्यकर्त्याला असे म्हणताना दिसतात की, एका मिनिटात नीट करून टाकेन, तुला जास्त मस्ती आली का? यावर प्रतिक्रिया देताना अंबादास दानवे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, संजय शिरसाट यांची बोलायची ही कोणती पध्दत आहे? खुलेआम धमक्या देत आहेत. पण पोलीस त्यांच्यावर कारवाई करणार नाहीत.

तर संजय शिरसाट म्हणाले की, जशास तसे उत्तर द्यावे लागते. मी ते उत्तर दिले आहे. मी एक तर कधी कुणाच्या नादी लागत नाही. नादी लागलो तर त्याला सोडत नाही. या प्रकाराची पोलीस तक्रार करण्याची आवश्यकता नाही. या छोट्या तक्रारी करण्यासाठी वेळ कुणाकडे आहे? छोटा विषय लगेचच त्याच ठिकाणी दाबला पाहिजे. अन्यथा छोटा विषय मोठा होतो आणि त्याचा मतदारांना त्रास होतो.

# मुख्यमंत्री शिंदेविरोधातील उमेदवार केदार दिघेंवर गुन्हा

■ ठाणे

**पैसे** आणि मद्य वाटल्याप्रकरणी कोपरी पाचपाखाडी मतदारसंघाचे ठाकरे गटाचे उमेदवार केदार दिघे यांच्याविरोधात काल रात्री कोपरी पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल केला. गाडीत विदेशी मद्य आणि पैशांनी भरलेली २६ पाकिटे ठेवल्याची तक्रारी शिंदे गटातील महिला पदाधिकाऱ्याने पोलिसांकडे केली होती. या निवडणुकीत केदार दिघे यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी लढत होत आहे.

मध्यरात्री २ वाजता अष्टविनायक चौक परिसरात मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी केदार दिघे, सचिन गोरिवले, प्रदीप शेंडगे, रविंद्र शिनलकर, प्रशांत जगदाळे, दत्ता पागवले, अनिता प्रभू, पांडुरंग दळवी सचिन गोरिवले यांनी वाहनामध्ये मद्य आणि प्रत्येकी दोन हजार रुपये भरलेली २६ पाकिटे ठेवली होती, असे या महिला पदाधिकाऱ्याने तक्रारीत म्हटले. दिघेंनी सांगितले की, सत्ताधारी घाबरले आहे. मी माझी गाडी स्वतःहून पोलीस स्टेशनला नेल्यानंतर त्या गाडीची तपासणी होऊन त्यात काहीही सापडले नाही.

# परळीत शरद पवारांच्या कार्यकर्त्याला मारहाण! कार्यकर्त्यांनी ईव्हीएम तोडले

■ बीड

**परळीमध्ये** अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून धनंजय मुंडे मैदानात आहेत. तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेसाहेब देशमुख हे निवडणूक रिंगणात आहेत. शरद पवार यांचे कार्यकर्ते माधव जाधव यांना धनंजय मुंडे यांच्या कार्यकर्त्यांनी मारहाण केली असा आरोप आहे.

माधव जाधव हे परळी शहरातील मतदान केंद्रास भेट देण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांना मारहाण केली. या घटनेचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यावर शरद पवार गटाचे कार्यकर्ते आक्रमक झाले. त्यांनी या घटनेच्या निषेधार्थ घाट नांदूरगावात मतदान केंद्रात तोडफोड केली. या केंद्रातील ईव्हीएम मशीन देखील फोडल्या.

या घटनेमुळे या परिसरात तणाव निर्माण झाला होता. त्यानंतर पोलिसांनी ही परिस्थिती नियंत्रणात आणली. माधव जाधव यांना मारहाण करणाऱ्यांना अटक करून त्यांच्यावर कारवाई करा अशी मागणी शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी केली आहे.

महाराष्ट्र जनरल कामगार युनियन
(मे. जे एन टि एल कंज्यूमर हेल्थ (इंडिया) प्रा. लि.) मुलुंड युनिट
स्व. डॉ. दत्ता सामंत
यांना ९२व्या जयंतीनिमित्त भावपूर्ण आदरांजली
दिनांक : २१ नोव्हेंबर २०२४



लाखो कामगारांचे श्रध्दास्थान व जागतिक कीर्तीचे झुंजार कामगार नेते स्व. डॉ. दत्ता सामंत यांना महाराष्ट्रातील आपल्या हजारो अनुयायांच्या वतीने भावपूर्ण आदरांजली.
आपले विनित
श्री. भूषण दत्ता सामंत, अध्यक्ष
श्री. वर्गिस चाको, सरचिटणीस
श्री. संजय कोळवणकर, उपाध्यक्ष
रोहन कांगणे, चंद्रकांत सूर्यवंशी, सुरेंद्र गवळी, भागवत सदगीर, संतोष थोरात
मे. जे एन टि एल कंज्यूमर हेल्थ (इंडिया) प्रा. लि. कंपनीतील कर्मचारी व स्टाफ
KParth

